सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### युतीसंदर्भात पवार-फडणवीसांची चर्चा

**मुंबई :** निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. राज्यातील २९ महापालिकांमध्ये राष्ट्रवादी ही भाजपसोबत युतीसाठी आग्रही आहे. मुंबईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा भाजपसोबत युतीसाठी आग्रह आहे. याच संदर्भात अजित पवार आणि देवेंद्र फडणवीसांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आणि अमरावतीमध्ये भाजप- राष्ट्रवादी वेगवेगळे लढणार आहे. मात्र इतर ठिकाणी युती शक्य आहे. त्यामुळेच या ठिकाणी महायुती म्हणून लढावे अशी भूमिका राष्ट्रवादीनं बैठकीत मांडल्याची माहिती मिळतेय.

### शेतकरी किडनी विक्रीप्रकरणी एसआयटी

**चंद्रपूर :** सावकारी कर्जाच्या परतफेडीसाठी चंद्रपुरातील मिन्थुर गावात रोशन खुडे शेतकऱ्याची किडनी विकल्या प्रकरणी चौकशीसाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षकांच्या नेतृत्वात आणि पोलिस अधीक्षकांच्या अधिपत्याखाली हे पथक काम करणार आहे. या प्रकरणाचा खुलासा झाल्यानंतर सहा जणांविरोधात गुन्हे दाखल केले असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकरणी अवयव विक्रिचं पथक कार्यरत असल्याचा संशय बळावल्यानं प्रकरणाच्या सखोल तपासासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे.

### बोगस मतदार पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक :** राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी आज (२० डिसेंबर) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार असून नाशिक जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकांच्या मतदानादरम्यान सिन्नर शहरात मोठी खळबळ उडाली आहे. सिन्नर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मधील मतदान केंद्रावर बोगस मतदार पकडल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. आज सकाळपासून सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान एक मतदार संशयास्पदरीत्या मतदानासाठी आल्याचे लक्षात आल्यानंतर निवडणूक कर्मचाऱ्यांनी तात्काळ चौकशी केली. चौकशीत सदर व्यक्ती बनावट आधार कार्डच्या आधारे आपल्या भावाच्या जागेवर मतदान करण्यासाठी आल्याचे उघड झाले.

### मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिकेसाठी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर अंबरनाथ शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये दोन जणांना पैशाची पॉकिट वाटत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडलंय. त्यानंतर या दोन जणांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी भरारी पथकाच्या ताब्यात दिलंय. सध्या घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून पुढील कारवाई सुरू आहे. भाजपच्या उमेदवाराकडून हे पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

### पावणे तीन लाखांचा अवैध दारूसाठा जप्त

**बीड :** बीड जिल्ह्यात नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५च्या अनुषंगाने आचारसंहिता सुरू आहे. या निमित्ताने पोलिसांनी शहरातील अवैध कारभारावर अंकुश बसण्यासाठी कारवाई करण्यात येत आहे. अशाच एका कारवाईत परळी शहरातील हॉटेल आबासाहेबच्या पुढे पत्र्याच्या शेडमध्ये अवैध दारूचे बॉक्स हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळालं असून यामध्ये एका आरोपीला ताब्यात घेण्यात आलं आहे.

### बारामतीच्या व्हीपी कॉलेजमध्ये राडा

**बारामती :** मागील वर्षी अल्पवयीन बहिणीची छेडछाड केल्याबाबत आरोपीला जाब विचारण्यासाठी विद्या प्रतिष्ठान कॉलेज परिसरात गेला होता. यावेळी आरोपींनी त्याच्यावर हातातील लोखंडी कडे आणि धारदार कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या घटनेप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी गौरव दिलीप टेंगले (रा. म्हसोबाचीवाडी, पणधरे, ता. बारामती, जि. पुणे) हा गेल्या एक वर्षापासून पोलिसांना गुंगारा देत होता. मात्र गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव आणि त्यांच्या टीमने गुप्त माहितीच्या आधारे एमआयडीसी परिसरातून आरोपीस अटक करत त्याच्या मुसक्या आवळल्या.

### खा. सोनवणेंचा धनंजय-पंकजा मुंडेंना इशारा

**बीड :** बीडमधील परळी नगर परिषदेची निवडणूक रंगतदार ठरू लागली आहे. खासदार बजरंग सोनवणेंनी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतली. कुठेही गेलो तरी माझं पूर्ण लक्ष परळीवर आहे, असे सोनवणे म्हणाले.यावेळी बोलताना सोनवणेंनी मुंडे भाऊ-बहिणीवर सडकून टीका केली. ४० वर्ष परळीचा विकास करू शकले नाहीत, असं म्हणत सोनवणेंनी हल्लाबोल केला.

# राज्यात २३ नगरपरिषद, नगरपंचायतींसाठी मतदान पूर्ण

**मुंबई :** राज्यातील २३ नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी आज मतदान पार पडलं असून मतदानाची अधिकृत वेळ संपली. मात्र, अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा लागल्याने उशिरापर्यंत मतदान सुरू राहिल्याचं चित्र दिसून आलं. दरम्यान, अनेक ठिकाणी शांततेत मतदान पार पडत असलं तरी काही ठिकाणी निवडणुकीला गालबोट लागलं. नांदेडमधील धर्माबादमध्ये महिलांना मंदिरात आणि मंगल कार्यालयात डांबून ठेवल्याची घटना समोर आली. तर अंबरनाथमध्ये शिंदेंच्या शिवसेनेने बोगस मतदान आणल्याचा आरोप भाजपने केला. रविवारी, २१ डिसेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे.

**अंबरनाथमध्ये बोगस मतदान**

अंबनाथमध्ये २०८ बोगस मतदार आणल्याचा आरोप भाजपनं शिंदेंच्या सेनेवर केला आहे. मतदानासाठी अनेक महिलांना एका सभागृहात गोळा केल्याचा आरोप भाजपच्या अभिजीत करंजुलेंनी केला आहे. यानंतर भाजप आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर काही वातावरण चांगलंच तापलं होतं.

अंबरनाथच्या मातोश्री नगर परिसरात पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. भाजप मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप शिंदेंच्या शिवसनेनं केला होता. यानंतर या परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. त्यामुळे कार्यकर्त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला.





तसंच घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त असल्याचंही पहायला मिळालं.

**नांदेडमध्ये मतदारांना कोंडून ठेवलं**

नांदेडमधील धर्माबादमध्ये मतदारांना कोंडून ठेवल्याचा आरोप करण्यात आला. भाजपनं शेकडो मतदारांना पैशांचं आमिष दाखवून बोलावून घेतलं आणि कोंडून ठेवल्याचा आरोप करण्यात आला प्रसादाच्या स्वरूपात चार हजार रुपये देणार असल्याचं सांगून मंदिरात ठेवल्याचा आरोप महिलांनी केला. कप बशीचं निवडणूक चिन्ह असलेल्या लोकांनी सकाळपासून डांबून ठेवल्याचा आरोप महिलांचांनी केला. तुमच्या समाजाच्या नेत्यापाशी पैसे देतो म्हणून कुंभार समाजातील महिला नजर कैदेत ठेवल्याचा आरोप करण्यात आला. इनानी मंगल कार्यालयात डांबून ठेवलेल्या मतदारांची नंतर सुटका करण्यात आली. त्यानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी ईनानी मंगल कार्यालयात पाहणी केली. त्यावेळी तिथे कोणीही नागरिक

> **राडा, बोगस मतदान अन् पैशाचं आमिष दाखवून महिलांना कोंडून ठेवलं**

किंवा त्याच्याशी संबंधित गैरप्रकार आढळल्या नसल्याचं निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं.

धर्माबादमध्ये तेलंगणातील मतदार येऊन बोगस मतदान करत असल्याचा आरोप करण्यात आला. बोगस मतदान केल्याच्या आरोपातून एका महिला आणि पुरुषाला जोरदार मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. मतदान केंद्रा बाहेर मोठा जमाव जमल्याने पोलिसांनी सौम्य लाठीमार केला.

**कोल्हापुरात राडा**

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लजमधील वार्ड क्रमांक तीन मधल्या एमआर हायस्कूल मतदान केंद्रावर वाद झाला. गोकुळचे चेअरमन नावेद मुश्रीफ यांना मतदान केंद्रात का सोडले असा आक्षेप विरोधकांनी घेतला. त्यानंतर दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. त्यामुळे मतदान केंद्रावर काही काळ तणावाचं वातावरण होतं. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत वाद मिटवला.

**कोपरगावात मतदान केंद्रावर गोंधळ**

कोपरगावमध्ये मतदान केंद्रावर गोंधळ झाला. भाजप आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांमध्ये बाचाबाची झाली, मतदारांवर उमेदवार प्रतिनिधी प्रभाव टाकत असल्याचा आरोप दोन्ही गटाकडून करण्यात आला. पोलिसांसमोरच दोन गटांमध्ये बाचाबाची झाली. यावेळी मतदार प्रतिनिधी आणि पोलिसांध्येही शाब्दिक चकमक झाली. कोपरगावमधील एस. जी. महाविद्यालयातील मतदान केंद्रावर काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झालं होतं.

**बारामतीमध्ये बोगस मतदान**

बारामती नगरपालिकेसाठी आज मतदान होतं, यावेळी एका मतदाराच मतदानच आधी कोणीतरी करून गेलं असल्याचं समोर आलं आहे. बारामतीतील अहिल्यानगर देवी क्लब या मतदार केंद्रात हा प्रकार घडला. अमित दिलीप कुलथे यांचे मतदान आधीच झालं होतं. अमित कुलथे मतदान केंद्रात दाखल झाले आणि त्यानंतर त्यांच्या हा प्रकार लक्षात आला. यानंतर त्यांच्याकडून निवडणूक केंद्रातील कर्मचाऱ्यांनी टेंडर वोट फॅर्म भरून अमित कुलथे यांनी मतदान केलं.

**फुलंब्रीत जादूटोणा**

छत्रपती संभाजीनगरच्या फुलंब्रीत ऐन मतदानादिवशी मतदान केंद्राबाहेर जादूटोणा केल्याचा प्रकार समोर आला. भारत माता शाळा मतदान केंद्राबाहेर काळी बाहुली, लिंबू आणि इतर साहित्य आढळलं.

नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर नगर परिषदेच्या तीन जागांसाठी आज मतदान पार पडलं. सिन्नरच्या प्रभाग २ च्या मतदान केंद्रावर बोगस मतदाराला पकडण्यात आलंय. निवडणूक अधिकाऱ्यांनी बोगस मतदाराला पोलिसांच्या ताब्यात दिलं.

# काँग्रेस स्वबळावर लढणार : चेन्नीथला

**मुंबई :** राज्यातील महानगर पालिकेच्या निवडणुकींचे बिगुल वाजले आहे. २९ महानगर पालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.

या निवडणुकीत सर्वांचे लक्ष मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर असणार आहे. शिवसेना ठाकरे गट या महापालिकेत सत्ता राखण्याचा प्रयत्न करणार आहे. तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप मुंबईत सत्ता स्थापनेचा प्रयत्न करणार आहे. महायुतीची जागावाटपावर चर्चा सुरू आहे. मात्र मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीत मोठी फूट पडली आहे. काँग्रेसने मुंबई महानगर पालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे या निवडणुकीतील रंगत वाढली आहे.

काँग्रेसने मुंबई महापालिका स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला हे सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत.



आज मुंबईत झालेल्या बैठकीनंतर रमेश चेन्नीथला यांनी आगामी निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले की, मुंबईत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. मुंबईचा हवा तसा विकास झालेला आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

**महाविकास भाजप आणि ठाकरे गटाविरुद्ध आमची लढाई – चेन्नीथला**

पुढे बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, आम्ही भाजप विरोधात आणि शिवसेना ठाकरे गटाविरोधात लढण्याचा निर्णय घेतला आहे. या लढाईत सच्चे देशभक्त आणि धर्मनिरपेक्ष लोकांनी आमच्यासोबत यावे. आमच्या हातात सत्ता आल्यानंतर आम्ही मुंबई महापालिकेचा कारभार चांगल्या पद्धतीने सांभाळू. आम्ही याबाबतचा जाहीरनामा तुमच्यासमोर सादर करू. त्यामुळे मतदारांना मी आवाहन करतो की, आम्हाला साथ द्या आम्ही मुंबईचा विकास करू.

# माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे निधन

**मुंबई :** ज्येष्ठ काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे निधन झाले आहे. त्या माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी होत्या. मुंबईतील माहिम येथील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. शालिनीताई पाटील या ९४ वर्षाच्या होत्या, गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. आता वृधापकाळाने त्यांच निधन झालं आहे.



शालिनीताई पाटील या माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी होत्या. त्या गेल्या काही काळापासून आजारी होत्या. आज त्यांनी मुंबईत माहिम येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यातील मूळ गावी त्यांच्यावर अंत्य संस्कार केले जाणार आहे. त्यांच्या निधनाने कांग्रेसवर शोककळा पोहोचली आहे. शालिनीताई यांनी वसंतदादांना खबीर साथ दिली होती.

# ठाकरे यांच्या युतीमुळे 'मविआ' फुटली!




**मुंबई :** मुंबईत नवाव मलिक यांच्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडल्याची चर्चा आहे. नवाब मलिक यांना सोबत घेण्यास भाजप आणि शिवसेनेचा विरोध आहे. मलिक यांच्याकडे नेतृत्व असेल तर राष्ट्रवादीसोबत जाणार नाही अशी भूमिका या दोन्ही पक्षांनी घेतलीय. ठाकरेंच्या युतीमुळे महाविकास आघाडी फुटली आहे. राष्ट्रवादीनंतर काँग्रेसने मोठा निर्णय जाहीर केला आहे. दरम्यान, मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ठाकरे बंधूंसोबत जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंशी युती करण्यासाठी राष्ट्रवादीचे मुंबईतील स्थानिक नेते अनुकूळ असल्याचं कळतंय. मुंबईत एकत्र लढण्याबाबत दोन वेळा चर्चा झाली असून जागावाटपाची अंतिम चर्चा लवकरच होणार असल्याचं समजतंय. संजय राऊत यांनी शरद पवारांची भेट घेतली होती. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या सोबत मुंबई महापालिका निवडणुकीत असावे ची भूमिका ठाकरे यांची शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांची आहे.

# स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १९६० पासून पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्यास प्रारंभ करणारे मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराज यांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले. संघाशी असलेली आपली नाळ त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम जोपासली.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला. उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व.सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय



योगदान दिले.

राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले.

सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले. तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, श्रीपादजी नाईक, चंद्रकांतदादा पाटील, विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले. त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते.

स्वामी दुर्गानंद गिरी यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी सात वाजता औसा तालुक्यातील वानवडा रस्त्यावरील प्रा. उमाकांत होनराव यांच्या शेतात मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जात वैधता पडताळणीसाठी मनपात आता स्वतंत्र कक्ष

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** येथील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत जात वैधता करण्यासाठी अर्ज स्वीकारून ते अर्ज जात पडताळणी समितीकडे पाठवण्यासाठी लातूर मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाने निश्र्चित केलेल्या आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे जात वैधता करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी अर्ज करावा लागतो. असे अर्ज स्वीकारून ते जिल्हा जात पडताळणी समितीकडे




पाठविण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात हा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून २२ ते ३० डिसेंबर या काळात अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज या कक्षाकडे आवश्यक कागदपत्रांसह संतोष लाडलापुरे व फजल शेख यांचेकडे सादर करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.



# लातुरात भावी नगरसेवकांचा जनसंपर्कावर भर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाकडून अद्याप प्रत्यक्ष उमेदवारीची घोषणा झालेली नसली तरीही अनेक भावी नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागात जाऊन जनसंपर्कावर भर दिल्याचे पाहावयास मिळत आहे. एकंदर मनपा निवडणुकीसाठीचे वातावरण आता तापायला सुरुवात झाल्याचे पदोपदी निदर्शनास येत आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नव्या वर्षात, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. लातूर मनपाची दुसरी सार्वत्रिक निवडणूक २०१७ ला झाली होती. मनपाचा कालावधी उलटून आता जवळपास तीन साडेतीन वर्षांचा काळ उलटला आहे. दरम्यानच्या काळात मनपावर प्रशासकराज होते. आजही मनपाचा गाडा हाकण्याचे काम मनपा आयुक्तच प्रशासक या नात्याने करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दि. ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घेण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला वेग आला आहे. पहिल्या टप्प्यात नगर पंचायत - नगर परिषद, दुसऱ्या टप्प्यात राज्यातील २९ मनपाच्या तर तिसऱ्या व अंतिम टप्प्यात जिल्हा




परिषद - पंचाय समितीच्या निवडणुका होणार आहेत. आता नगर परिषद - नगर पंचायतचा एक टप्पा पूर्ण होत आला आहे. दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी प्रमुख राजकीय पक्षांचे संभाव्य उमेदवार आपल्याला पक्षाकडून निश्र्चित उमेदवारी मिळेल या आशेने कामाला लागल्याचे पाहावयास मिळत आहे.

लातूर शहरात एकूण १८ प्रभागातून ७० नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. नगरसेवकपदाच्या आरक्षणाच्या सोडतीत अनेक प्रभागाचे आरक्षण बदलले आहे. त्यामुळे अशा प्रभागात पूर्वीपासून मनपा निवडणुकीची तयारी करणाऱ्या पुरुष उमेदवारांना आपोआप बाजूला व्हावे लागले. त्यामुळे त्यांनी नाराज न होता आपल्याऐवजी आपल्या पत्नीला उमेदवारीसाठी पुढे केल्याची उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष नामनिर्देशनपत्रे दाखल व्हायला आणखी दोन दिवसांचा अवधी आहे. त्यातच कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने अद्याप कोणत्याही उमेदवाराची घोषणा केलेली नाही.

पक्ष आपले आजपर्यंतचे काम पाहून आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आशेने अनेकांनी जनसंपर्कावर भर देण्यास सुरुवात केली आहे. शहराच्या विविध प्रभागात सकाळच्या वातावरणात असे अनेक संभाव्य उमेदवार आपल्याला मतदान करावे, अशा आशयाचे आवाहन करताना फिरत असल्याचे निदर्शनास येत आहे. महिला राखीव प्रभागात महिला मतदार - कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भावी नगरसेविका आपल्या पक्षाला व आपल्याला मतदान करून विजयी करण्याचे आवाहन करताना दिसत आहेत.

भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे इच्छुक उमेदवार उमेदवारीच्या अपेक्षेने आतापासूनच कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी एकत्रित या निवडणुका लढविणार असल्याचे सांगण्यात येत आहे. जर असे झाले तर अनेक इच्छुकांचा पत्ता आपोआप कट होण्याची भीती आहे. कारण त्या त्या घटक पक्षाला त्यांच्या प्रभावानुसार जागांचे वाटप ह्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनेक इच्छुकांना डावलले जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

या निवडणुका प्रत्येक राजकीय पक्ष स्वतंत्रपणे लढला तरच इच्छुक कार्यकर्त्यांची उमेदवारीची अपेक्षा पूर्ण करणे त्या त्या पक्षाच्या संबंधित नेत्यांना शक्य होणार आहे. महायुती - महाविकास आघाडीने ही निवडणूक एकत्रित लढल्यास अनेक दिवसांपासून निवडणुकीची तयारी करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून बंडखोरी होण्याची भीती आहे. प्रत्यक्षात काय होईल याबद्दल आत्ताच ठामपणे बोलणे शक्य नाही. मात्र, तूर्तास संभाव्य उमेदवारांनी जनसंपर्कावर भर देण्यास सुरुवात केली आहे.

# टीईटीचा विषय निकाली निघेपर्यंत पदोन्नतीबद्दल संभ्रम



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** जिल्हा परिषद, खाजगी शाळांतील शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याची केलेली सक्ती आणखी संपुष्टात आलेली नाही. आता मोठा प्रश्न असा आहे की, टीईटीचा विषय निकाली निघेपर्यंत शिक्षकांना पदोन्नती मिळेल का नाही, याबद्दल शिक्षकांत संभ्रम आहे. शिक्षकांना पदोन्नती मिळण्याची अपेक्षा असली तरी टीईटीचा विषय अडसर ठरण्याची भीतीच आहे.


टीईटी परीक्षा आणि २०२४ मध्ये काढलेले जाचक अध्यादेश मागे घ्यावेत म्हणून शिक्षकांनी गेल्या पाच डिसेंबर २०२५ रोजी शाळा बंद करून मोर्चा काढला. याचा परिणाम फारसा झालेला दिसत नाही. अजून राज्य सरकारने टीईटीसंबंधी पुनर्विचार याचिका न्यायालयात दाखल केलेली नाही. त्यामुळे टीईटीचे संकट पूर्णपणे टळलेले नाही. या टीईटीमुळे शिक्षकांना पदोन्नती मिळण्यात अडचण होणार आहे. राज्य सरकार ठोसपणे शिक्षकांच्या पाठिशी उभे राहात नसल्याने मोठी अडचण होत असून, शिक्षकांची मानसिकता टीईटी देण्याची नाही. शिक्षक म्हणतात, आम्ही जिल्हा निवड समितीद्वारा परीक्षा, मुलाखत देऊन सेवेत आलो आहोत. पुन्हा टीईटी देण्याची अट चुकीची असून, आम्हाला यातून सूट द्यावी, अशी प्रमुख मागणी शिक्षकांनी आहे.

वास्तविक, शिक्षकांची मागणी खरी आहे. त्यांना शाळा करण्याबरोबरच प्रशासकीय कामे, शाळा सांभाळणे आणि आता टीईटी परीक्षा ही अट चुकीचे असल्याचे वाटते. हे खरे असले तरी सरकारने शिक्षकांबाबत सहानुभूतीने विचार करण्याची गरज आहे. पदोन्नतीस टीईटी अट अडसर ठरण्याची शंका शिक्षक बोलून दाखवत आहेत.

# ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांचे आज जाहीर व्याख्यान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना आज, रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी प्रदान केला जाणार आहे. त्यावेळी ते 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देतील. हा कार्यक्रम सायंकाळी ४.३० वाजता दयानंद सभागृहात होणार आहे.



**मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराचे आज वितरण**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री दिलीपराव देशमुख व समाजवादी नेते सुभाष वारे उपस्थित राहणार आहेत.

ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज हंडियाचे संयोजक व भारत ओडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

प्रशांत भूषण हे भारतातील सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता, लेखक, सामाजिक आणि जनहित याचिका (पीआयएल) लढवणारे प्रसिद्ध व सार्वजनिक हिताचे वकील आहेत. ते भ्रष्टाचार, राजकीय आणि प्रशासकीय दुरुपयोग, पर्यावरणीय समस्या आणि नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्यांचा कायदेशीर आवाज म्हणून ओळखले जातात.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी मंचातर्फे करण्यात आले आहे.


# स्व. शिवराज पाटील चाकूरकरांच्या नावाने राज्य, केंद्रीय विद्यापीठाची मागणी

**व्यापक पाठपुरावा करणार; लवकरच बैठक-डॉ. जगन्नाथ पाटील यांची माहिती**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** स्व. माननीय शिवराज पाटील (चाकूरकर) यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ लातूर येथे त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी डॉ. जगन्नाथ शामराव पाटील यांनी राज्य व केंद्र शासनाकडे औपचारिक निवेदनाद्वारे केली आहे. राज्य शासनाकडे स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) राज्य विद्यापीठ स्थापन करण्याची, तर केंद्र शासनाकडे केंद्रीय विद्यापीठाची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व माननीय केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केंद्रीय विद्यापीठासाठी सविस्तर निवेदन पाठवण्यात आले असून, ई-मेलद्वारेही याचा पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच राज्य विद्यापीठाच्या मागणीसाठी माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडेही निवेदने सादर करण्यात आली आहेत.



या मागणीच्या अनुषंगाने लवकरच व्यापक स्वरूपात बैठक बोलावण्यात येणार असून, या बैठकीत शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, शिवराज पाटील यांचे प्रेमी, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व सर्वपक्षीय कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. सर्व संबंधित लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकार्यांकडे प्रत्यक्ष भेटीची वेळ घेऊन निवेदन देण्याचे नियोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून संघटित व प्रभावी पाठपुरावा करण्यात येणार आहे. याचबरोबर स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) यांच्या कुटुंबीयांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात येणार आहे. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना निवेदन सादर करून या मागणीच्या पाठपुराव्यासाठी सहकार्य करण्याची विनंती करण्यात येणार आहे. शिवराज पाटील यांचे महाराष्ट्रभरातील व देशभरातील समर्थक, अनुयायी आणि सुजाण नागरिकांना आवाहन करण्यात येणार असून, त्यांनी एकत्र येऊन राज्य विद्यापीठ व केंद्रीय विद्यापीठ या दोन्ही मागण्यांसाठी सक्रिय पाठपुरावा करावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) हे सुमारे सहा ते सात दशके सार्वजनिक जीवनात कार्यरत राहिलेले, अतिशय शिस्तप्रिय, चारित्र्यवान, अभ्यासू व चिंतनशील व्यक्तिमत्त्व होते. नगराध्यक्ष, आमदार, विधानसभा अध्यक्ष, खासदार, केंद्रीय गृहमंत्री, संरक्षणमंत्री तसेच लोकसभेचे अध्यक्ष अशी अनेक सर्वोच्च पदे भूषवूनही त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीवर कधीही भ्रष्टाचाराचा डाग लागला नाही. संविधाननिष्ठ विचार, साहित्यिक जाण तसेच विज्ञान व अध्यात्माची सांगड हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. मराठवाड्यासारख्या मागास भागातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे प्रतिनिधित्व करणार्या या महान नेतृत्वाच्या नावाने विद्यापीठ स्थापन झाल्यास मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनाची प्रेरणा भावी पिढीला मिळेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# आगामी महानगरपालिका निवडणुकीत जैन समाज निर्णायक भूमिकेत : संदीप भंडारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** व्यापार, उद्योग, सहकार, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात देशाला दिशा देणारा जैन समाज आता राजकारणातही निर्णायक व नेतृत्वाची भूमिका घेण्यासाठी पूर्णतः सज्ज झाला

**एकट्या भाजपाकडून १५० हून अधिक जैन उमेदवार निवडणूक लढण्यासाठी इच्छुक, प्रत्येक महापालिकेत भाजपाचा भगवा फडकवण्याचा निर्धार**

आहे. संकटाची वेळ असो वा नैसर्गिक आपत्ती, जैन समाजाने नेहमीच तन-मन-धनाने समाजसेवेत पुढाकार घेतला आहे. देशाच्या जीडीपीमध्ये भरीव योगदान देणारा हा समाज आता संघटितपणे राजकारणात उतरून आपली ताकद दाखवत आहे, असे प्रतिपादन भाजपा जैन प्रकोष्ठाचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांनी केले.

जैन समाज हा भारतीय जनता पक्षाचा पारंपारिक, विश्र्वासू व विचारांशी बांधील मतदार राहिला आहे. २०२१ मध्ये तत्कालीन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनी महाराष्ट्रात देशात प्रथमच भाजपा जैन प्रकोष्ठाची स्थापना करून जैन युवकांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले. या प्रकोष्ठाच्या प्रदेशाध्यक्षपदी संदीप भंडारी



यांची नियुक्ती झाल्यानंतर अल्पावधीतच राज्यभर हजारो जैन समाजातील सामाजिक कार्यकर्ते भाजपाशी जोडले गेले आणि भाजपा जैन प्रकोष्ठ एक मजबूत, शिस्तबद्ध व प्रभावी संघटन म्हणून उभे राहिले.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा जैन प्रकोष्ठाच्या कार्यकर्त्यांनी बूथ पातळीवर प्रभावी कामगिरी करत जैन समाजातील मतदानाचा टक्का लक्षणीयरीत्या वाढवला. या यशानंतर आता आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक महापालिकेत भाजपाचा भगवा फडकवण्याचा ठाम संकल्प जैन समाजाने केला आहे. अखिल भारतीय अल्पसंख्यांक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी व भाजपा जैन प्रकोष्ठाचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांच्या नेतृत्वाखाली एकट्या भाजपाकडून १५० हून अधिक जैन कार्यकर्ते महानगरपालिका निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. जैन समाजाच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर संघटित व आक्रमक राजकीय सहभाग पाहायला मिळत असून, ही बाब येणाऱ्या निवडणुकांत निर्णायक ठरणार आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर भाजपा जैन प्रकोष्ठाने मागील ८ महिन्यांपासून नियोजनबद्ध व व्यापक निवडणूक तयारी सुरू केली आहे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी महापालिका-निहाय कोअर कमिट्या जाहीर करण्यात आल्या असून, प्रत्येक प्रभागात जैन समाजाची प्रभावी राजकीय उपस्थिती निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जैन समाज तन-मन-धनाने भाजपाच्या पाठीशी उभा राहून महापालिकांमध्ये भाजपाला अधिक बळकट करेल, असा ठाम विश्र्वास संदीप भंडारी यांनी व्यक्त केला.

भाजपाने नेहमीच जैन समाजाच्या हितासाठी ठाम भूमिका घेत ठोस निर्णय राबवले आहेत. जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ ची स्थापना व निधीची तरतूद, मरीन ड्राईव्ह येथे जैन जिमखान्यासाठी अडीच एकर भूखंड, भगवान महावीर २५५० वा निर्माण कल्याणक महोत्सव प्रथमच राज्यस्तरावर साजरा करणे, मुख्यमंत्री जेष्ठ नागरिक तीर्थयात्रा योजनेत १२ जैन तीर्थस्थळांचा समावेश, गोमातेला 'राज्यमाता' घोषित करणे व गोवंशासाठी प्रतिदिन १०० अनुदान यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांमुळे जैन समाजाचा विश्र्वास भारतीय जनता पक्षावर अधिक दृढ झाला आहे. युती सरकारने व्यापार व उद्योग क्षेत्रासाठी घेतलेल्या दूरदृष्टीपूर्ण व विकासाभिमुख निर्णयांमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये जैन समाज महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभा राहील असा विश्वास जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला आहे.

## आज राज्यस्तरीय धनगर समाज वधु-वर परिचय मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळ, लातूर यांच्या विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धनगर समाजाचा २० वा राज्यस्तरीय वधु - वर परिचय मेळावा आज सकाळी १०.०० वा. विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड लातूर येथे संपन्न होणार आहे.

तरी या मेळाव्यासाठी उद्घाटक म्हणून होळकर घराण्याचे वंशज स्वप्निलराजे होळकर हे तर प्रमुख पाहुणे म्हणून होळकरशाही अभ्यासक प्रा. डॉ. कुंभारगावे उपस्थित राहणार आहेत.

तरी या भव्य दिव्य वधु वर परिचय मेळाव्यास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून उपरोक्त मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यातून लम्पी साथ हदपार होतेय!

लातूर : गेल्या पावसाळ्यात गोवंशास लम्पी साथीने घेरल्याने पशुसंवर्धन विभागाची मोठी पंचाईत झाली. लम्पी साथीवर रामबाण लस अथवा औषध गोळ्या नसल्याने पशुसंवर्धन विभागाने कोरोना पॅटर्नसारखी लस जिल्ह्यातल्या गोवंशास दिली. ही लस प्रतिकारशक्ती वाढविणारी असली तरी त्याचा लाभ होईलच, असे सांगता येत नाही, असे एका पशुसंवर्धन विभागातल्या अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

आता लम्पी साथ जिल्ह्यातून हदपार होत असल्याचे चित्र आहे. तरी समूळ उच्चाटन आणखी झालेले नाही. गोवंशास लम्पी साथीने घेरल्याने लातूर जिल्ह्यातील गोवर्गीय जनावरांची संख्या रोडावली. परिणामी, जनावरांच्या बाजारात बेभाव गाय, कालवड, बैल विक्रीचा सपाटा पशुपालक, शेतकऱ्यांनी लावला होता. ऐन पावसाळ्यात लम्पी साथीने डोकेवर काढल्याने ती अटोक्यात आणण्याचे आव्हान पशुसंवर्धन विभागासमोर होते. सततचा पाऊस अन् साथीचा पसरता आवाका पाहून पशुसंवर्धन विभाग हतबल होण्याच्या स्थितीत आला होता. आता एक महिन्यापासून लम्पी साथ हळूहळू कमी होत असून, आणखी संपूर्ण प्रभाव ओसरलेला नाही.

गोवंशावर हे क एक प्रकारचे संकटच होते. जसे माणसावर कोरोनाचे होते तसे. आता परिस्थिती अटोक्यात येत असली तरी गोवंशाची संख्या रोडावल्याचे चित्र असून, नेमके किती कमी झाले अजून स्पष्ट झालेले नाही. गेल्या मार्च-एप्रिल महिन्यात झालेल्या पशुगणनेचा अहवाल प्रसिद्ध न झाल्याने गोवंशाची संख्या किती आहे, हे स्पष्ट होऊ शकले नाही. केंद्र सरकार पशुगणनेचा अहवाल जाहीर करणार आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यात नेमकी पशु संख्या किती हे कळू शकलेले नाही. मात्र, गोवंशावरील लम्पी साथीचे संकट हादपार होत असून, ते लवकरच संपुष्टात येईल, असे पशुसंवर्धन विभागाच्या सूत्रांनी सांगितले

## थोडक्यात...

### ‘घरवाली पेडवाली’-हलकी-फुलकी कौटुंबिक विनोदी मालिका

**छत्रपती संभाजीनगर :** प्रेक्षकांना नवे आणि हटके कौटुंबिक मनोरंजन देण्याच्या उद्देशाने एण्ड टीव्हीवर नवीन विनोदी मालिका ‘घरवाली पेडवाली’ सुरू होत आहे. ही मालिका १५ डिसेंबरपासून दर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता प्रसारित आहे. पेनिन्सुला प्रोडक्शन्स निर्मित या मालिकेत कौटुंबिक विनोदासोबत अलौकिक शक्तींचा मजेशीर ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. या मालिकेत पारस अरोरा (जीतू), सीरत कपूर (सावी-घरवाली) आणि प्रियमवदा कांत (लतिका-पेडवाली) प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय रिचा सोनी, गीता बिष्ट, हर्ष वशिष्ठ, ब्रिज भूषण शुक्ला आणि अमिताभ घाणेकर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

### कलाकारांनी सांगितले हिवाळ्यात आस्वाद घेतल्या जाणाऱ्या खास पदार्थांबद्दल!

**छत्रपती संभाजीनगर :** थंडी वाढू लागली असून, एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार त्यांच्या मूळगावी हिवाळ्यामध्ये आस्वाद घेतल्या जाणाऱ्या पारंपारिक, घरगुती खाद्यपदार्थांबद्दल सांगत आहेत. 'घरवाली पेडवाली'मधील लतिका (प्रियमवदा कांत), 'हप्पू की उलटन पटन'मधील दरोगा हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) आणि 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी (रोहिताश्व गौड) हे कलाकार या स्वादिष्ट फ्लेवर्सबद्दल माहिती देत आहेत. दिल्लीकर प्रियमवदा कांत म्हणाल्या, की दिल्लीमध्ये हिवाळा हा खाद्यपदार्थांचा मोठा उत्सव असतो. त्या ब्रेकफास्टसाठी तव्यावरून येणारे गरमागरम पराठे, गरमागरम छोले कुलचे किंवा देशी तूपासह बनवलेल्या गाजराच्या हलव्याचा आस्वाद घेतात. हे सर्व पदार्थ घरगुती असल्यासारखे वाटतात आणि थंडीत आनंद देतात.

### उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा आयव्हरी प्रोग्राम

**मुंबई :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आज 'आयव्हरी' नावाचा एक बँकिंग उपक्रम सुरू केला, जो भारतातील उच्च-मध्यमवर्गीय ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत वैयक्तिक बँकिंग सेवेला जीवनशैलीशी संबंधित विशेषाधिकारांसह जोडले जाते, ज्यामुळे वर्धित व्यवहार क्षमता, जागतिक पोहोच आणि महत्त्वाचे बँकिंग व्यवहार तसेच सेवांवर शून्य-शुल्क बँकिंगची सुविधा मिळते. यासाठी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची मते जाणून घेण्यात आली आहेत. त्यातूनच हा 'आयव्हरी' कार्यक्रम विकसित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम अशा ग्राहकांसाठी आहे, जे त्यांना जशी जीवनशैली हवी आहे, त्याच्याशी जुळणाऱ्या आर्थिक समाधानांच्या शोधात आहेत. डिजिटल बँकिंगसोबतच मनोरंजन आणि जेवणाचे फायदे यांसारखे निवडक अनुभव ही सेवा देते.

### सादर करत आहे पवित्र अष्टविनायक कथा

**छत्रपती संभाजीनगर :** गणेश कथा पिढ्यान् पिढ्या मौखिक परांपरेतून जिवंत राहिल्या आहेत. आजी-आजोबा खूप भक्तीने, सोप्या शब्दांत आणि प्रेमळ स्वरात या कथा आपल्या नातवंडांना सांगत असतात. भारतातील एक प्रसिद्ध मनोरंजन वाहिनी सोनी सब ही परंपरा पुढे नेत आजच्या पिढीला गणेश कथा सांगत आहे. ‘गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय’ या मालिकेत आता पुढील टप्प्यावर अष्टविनायक रूपांच्या कथा तितक्याच भक्तिभावाने आणि पवित्र भावनेने सादर होणार आहेत.

### अत्याधुनिक एंडोस्कोपिक शस्त्रक्रियेद्वारे पिट्युटरी ट्युमरवर यशस्वी उपचार

**पुणे :** मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी अत्याधुनिक आणि चीरा ना मारता (दुर्बिणीद्वारे) एंडोस्कोपिक एंडोनेझल ट्रान्सस्फेनॉइडल तंत्राचा वापर करून मेंदूच्या तळाशी असलेला पिट्युटरी मॅक्रोॲडेनोमा हा जटिल ट्युमर यशस्वीपणे काढून टाकला. या ३९ वर्षीय महिला रुग्णाला दीर्घकाळ तीव्र डोकेदुखी आणि दोन्ही डोळ्यांची दृष्टी हळूहळू कमी होण्याची समस्या होती. अनेक नेत्रतज्ज्ञांकडे उपचार घेऊनही दृष्टीत सुधारणा न झाल्याने अखेरीस त्यांना मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील न्यूरोसर्जन डॉ. सचिन पाटील यांच्याकडे पाठविण्यात आले.

### महाराष्ट्रातील गुंतवणुकीची आवड कायम

**मुंबई :** मुंबई आणि महाराष्ट्रातील गुंतवणुकीची आवड कायम आहे, आणि राज्य भारतामध्ये येणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास एक तृतीयांश गुंतवणूक आकर्षित करत आहे, असे महाराष्ट्राचे पणन (कृषी) आणि राजशिष्टाचार मंत्री श्री. जयकुमार रावल यांनी सीआयआय मुंबई आंतरराष्ट्रीय शिखर परिषद २०२५ मध्ये बोलताना सांगितले.माननीय मंत्र्यांनी नमूद केले की, भारताला लाखो कोटी रुपयांच्या मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणूक मिळत आहे आणि महाराष्ट्र सातत्याने त्यात महत्त्वपूर्ण वाटा मिळवत आहे. ते पुढे म्हणाले की, 'स्वप्नांचे शहर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईकडे गुंतवणूकदार अजूनही मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत, आणि ही शहर जागतिक भांडवलासाठी एक चुंबकासारखे काम करत आहे.श्री. रावल यांनी पुढे अधोरेखित केले की, शाश्र्वत पायाभूत सुविधा विकास आणि मजबूत व्यावसायिक परिसंस्थेच्या पाठिंब्यामुळे मुंबई फिनटेक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक व्यवहारांसाठी एक जागतिक केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे.

### आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज सादर!

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने गुजरातमधील गिफ्ट सिटीद्वारे अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) विशेषतः डिझाइन केलेले ‘आयडीएफसी फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट इन यूएसडी आणि युरो’ सादर केले आहे. ही ऑफर देशांतर्गत किंवा एनआरआय बचत खात्यापेक्षा वेगळी आणि विशेषतः अशा ग्राहकांसाठी डिझाइन केलेली आहे जे परकीय चलनात बचत खाते चालवू आणि राखू इच्छितात आयडीएफसी फर्स्ट बँकेचे प्रमुख रिटेल लायबिलिटीज आशिष सिंग म्हणाले, फर्स्ट ग्लोबल सेव्हिंग्ज अकाउंट हे अनिवासी भारतीयांना भारतासोबत बँकिंग कसे करावे हे पुन्हा परिभाषित करण्यासाठी सज्ज आहे. या प्रस्तावाद्वारे, आम्ही अनिवासी भारतीयांना त्यांचे बचत खाते यूएसडी किंवा युरोमध्ये ठेवण्याची, उच्च व्याजदर मिळविण्याची, शून्य शुल्क रेमिटन्स मिळविण्याची आणि विश्र्वास आणि उच्च सुरक्षिततेसह आयडीएफसी फर्स्ट उच्च दर्जाचा डिजिटल अनुभव घेण्याची सुविधा देतो. आमच्या ग्राहकांच्या वाढत्या गरजांनुसार आमची उत्पादने डिझाइन करण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे आणि ही ऑफर जागतिक भारतीयांसाठी आंतरराष्ट्रीय बँकिंग सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

### टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५ ची तिसरी आवृत्ती प्रकाशित

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट बँकिंग आणि हुरुन इंडियाने ‘आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट अँड हुरुन इंडियाज टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५’ ची तिसरी आवृत्ती सुरू केली, जी २००० नंतर स्थापन झालेल्या भारतातील २०० सर्वात मौल्यवान कंपन्यांची यादी आहे. या कंपन्यांना त्यांच्या मूल्यानुसार क्रमवारी लावली जाते, सूचीबद्ध कंपन्यांसाठी बाजार भांडवलीकरण आणि सूचीबद्ध नसलेल्या कंपन्यांसाठी मूल्यांकन म्हणून परिभाषित केले जाते. या यादीत येण्यासाठी कट-ऑफ तारीख २५ सप्टेंबर २०२५ होती. ही यादी फक्त भारतात मुख्यालय असलेल्या कंपन्यांचा संदर्भ देते.

# सिल्लोड नगरपरिषद निकालाकडे राज्याचे लक्ष

## एकतर्फी वर्चस्व प्रस्थापित करत अब्दुल सत्तार पुन्हा ‘पॉलिटिकल स्ट्राइक’ करणार का?

**सिल्लोड, दि. २० डिसेंबर :** सिल्लोड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा आज निकाल जाहीर होत असून, या




निकालाकडे केवळ सिल्लोडच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्ष पदासह २८ नगरसेवकांच्या जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार पुन्हा एकदा एकतर्फी राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणार का, की सत्ताधारी भाजपकडून सिल्लोडच्या राजकारणात निर्णायक उलथापालथ घडवून आणली जाणार, याबाबत आज अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. विलंबित मतमोजणीमुळे गेल्या १६-१७ दिवसांपासून राजकीय वातावरणात असलेली उत्कंठा आज शिगेला पोहोचली आहे

दरम्यान शहरात गत वेळेस दोन जागा मिळवणाऱ्या भारतीय जनता पार्टीची कामगिरी यावेळी सुधारते की आणखी हलवते यावर शहरात चर्चा सुरू आहे.

सिल्लोड शहरात एकूण ५४ हजार ८०८ मतदारांपैकी १४ प्रभागात २६ सदस्य निवडून देण्यासाठी तसेच नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रियेत भाग घेतला. निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार १.१०२ दुबार नावे वजा केल्यास प्रत्यक्ष मतदार संख्या ५३,७०६ वर स्थिरावते त्यानुसार सुधारित मतदान टक्केवारी ७६ टक्क्याच्या जवळ गेली. मतमोजणीची तारीख पुढे ढकलण्यात आल्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची आपापल्या उमेदवारांच्या च्या खात्री असलेल्या माजी मंत्री मा. मंत्री अब्दुल सत्तार यांनी या निवडणुकीतही नेहमीप्रमाणे संपूर्ण ताकद पणाला लावली होती निवडणूक जाहीर होण्याच्या तीन महिन्या अगोदर त्यांनी विविध वार्डात भेटी गाठी घेत प्रचाराला सुरुवात केली होती. अब्दुल समीर यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासहित अनेक प्रभागातील उमेदवार जवळपास निश्र्चित असल्याने त्यांना प्रचार सुरू करण्यात मदत झाली. निवडणूक घोषित झाल्यापासून ते मतदान संपल्यानंतरही आमदार अब्दुल सत्तार हे नगराध्यक्ष पदा सहित सर्व २८ नगरसेवक निवडून आणण्याचा दावा करीत असून त्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्व जागा निवडून येतील असा विश्वास आहे.

दुसरीकडे राज्यातील प्रमुख सत्ताधारी पक्ष असलेल्या भाजपवाले यावेळच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीसह उतरण्याची तयारी सुरुवातीपासूनच केली. निवडणुकीची सूत्रे प्रदेश सचिव सुरेश बनकर यांच्या हाती देण्यात आली होती. माझी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केवळ एक दिवस अगोदर सभा तेवढाच आपला सहभाग नोंदविला.

भाजपने मनोज मोरलो यांना नगराध्यक्ष पदासाठी उभे केले आहे. भाजपच्या वतीने कॅबिनेट मंत्री अतुल सावे, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजय केनेकर यांनी भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी सभा घेतल्या.

**दोघांकडूनही विजयाचे दावे**

आमदार अब्दुल सत्तार यांच्याशी टक्कर देताना कुठलेही बाजू कमकुवत राहणार नाही याची काळजी यावेळी भाजपने घेतलेली दिसली. ग्रामीण भागातील भाजपचे कार्यकर्ते प्रचंड संख्येने यंदा नगरपरिषद निवडणुकीच्या दहा दिवसा अगोदर पासून सिल्लोड शहरात तळ ठोकून होते. व त्याचा फायदा उमेदवाराला निश्चित होईल असे भाजप नेते म्हणत आहे.

या निवडणुकीत किमान सात ते आठ नगरसेवक निवडून येतील असा दावा भाजपच्या वतीने केला जात आहे याशिवाय वंचित बहुजन आघाडीचे बनेगा पठाण बसपाचे राजीव रोजेकर यांच्यासह नगराध्यक्ष पदाचे ६ उमेदवार रिंगणात आहे शिवसेना, उबाठा. काँग्रेस पक्ष भाकप एम आय एम राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट बसपा यांनीही उमेदवार उभे केले

# जरंडीचा ‘पंचायतराज’मध्ये सहभाग; करवसुलीत जरंडी अव्वल

## नऊ लाख वसूल; विविध विकासकामांमध्ये आगेकूच

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.२० डिसेंबर :** ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासह सुशासन आणून जलसमृद्ध स्वच्छ, हरित गावे निर्माण करण्याच्या



उद्देशाने शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सुरू केले आहे. या योजनेत जरंडी येथील ग्रामपंचायतीने सहभागी होऊन आगेकूच केली आहे.या अभियानात( दि.१७) पर्यंत लोकसहभागातून नऊ लाख रु कर वसुली झाल्याचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलतानी सांगितले

जरंडीचे सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे व सदस्यांनी या अभियानाच्या माध्यमातून गावात हुतात्मा स्मारक वृक्ष लागवड, स्मशानभूमी परिसरात पेव्हर ब्लॉक,महादेव मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक,अभ्यासिका पेव्हर ब्लॉक,नदी खोलीकरण, रंगरंगोटी

संजय गांधी योजना, सोलर बसविणे, शेती पंप सोलर, पाणी ताळेबंद, विविध विकासकामे, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, पशुंचे लसीकरण, वनराई बंधारे, आदी नाविन्यपूर्ण उपक्रम केले आहे

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मालमत्ता कर,पाणीपट्टीआणि दिवाबत्ती कर थकबाकीमध्ये निकषांच्या आधारे पन्नास टक्के सवलत देण्यात आली आहे.याचा करदात्यांना मोठा लाभ होत असून ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद या योजनेला मिळत आहे.२७५ नागरिकांनी या कर सवलत योजनेचा उपयोग घेतला आहे. गावात दैनंदिन स्वच्छता राहावी यासाठी घंटागाडीच्या माध्यमातून कचरा संकलन करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीतर्फे मार्फत ग्रामस्थांना डिजीटल सेवा देखील उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री समृद्धपंचायतराज अभियानात जरंडी ग्रामपंचायतीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गावातील युवकांना स्पर्धा परीक्षा व इतर परीक्षांसाठी अभ्यासिका केंद्र गाव समृद्ध व्हावे,तसेच तीर्थक्षेत्र महादेव मंदिर परिसराचा कायापालट व्हावा, यासाठी ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामस्थ एकजुटीने अभियान राबविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. प्रत्येकाला शासकीय योजनेचा लाभ मिळावा.

**-स्वाती पाटील, सरपंच**

**अधिकाऱ्यांची भेट**

पंचायत राज अभियानाच्या मूल्यांकनाच्या दृष्टीने तसेच अभियान काळात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत माहिती जाणून घेण्यासह प्रत्यक्ष कामकाजाची गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड, विस्तार अधिकारी अशोक दौड, सुनील राकडे यांनी भेट देऊन पाहणी केली. ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# लेखक लढवय्या असतो : मावजो

**एमजीएममध्ये आयोजित साहित्यिक गप्पांमध्ये साहित्यिक दामोदर मावजो यांनी साधला संवाद**

**छत्रपती संभाजीनगर, दि.२० डिसेंबर :** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक दामोदर मावजो यांनी छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशनच्या (एमजीएम) ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'साहित्यिक गप्पां'मध्ये संवाद साधला. यावेळी त्यांनी 'लेखक हा लढवय्या असतो' असे प्रतिपादन केले. लेखक हा आपल्या विवेकबुद्धीला पटणारेच लिहितो आणि शब्दांच्या माध्यमातूनही तो विद्रोह करू शकतो, असे ते म्हणाले.

तरुण पिढी साहित्यापासून दूर जात नाही, तर त्यांची वाचनाची माध्यमे बदलली आहेत. त्यामुळे आजच्या साहित्यात त्यांचे प्रतिबिंब दिसले पाहिजे, असे मत



त्यांनी व्यक्त केले.

भारतातील भाषिक विविधता महत्त्वाची असून, भाषांमध्ये वैर असता कामा नये. हिंदी ही राष्ट्रभाषा नसून ती संपर्काची भाषा आहे. भाषेवर प्रेम असले तरी भाषेच्या सक्तीला विरोध असावा. मराठी साहित्याचे वाचन आवडते आणि ते इतर भाषांपेक्षा जवळचे वाटते, असे मावजो यांनी सांगितले. तरुण पिढीला इतिहासाचे योग्य शिक्षण मिळत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. काही संपादकांनी आपले लेख छापायचे की नाही हे ठरवावे, असेही ते म्हणाले.

यावेळी, एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, सचिव अंकुशराव कदम, विश्र्वस्त डॉ. सुधीर कदम, दिग्दर्शक जयप्रद देसाई, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, शहरातील साहित्यिक, लेखक आणि सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

# ६ फेब्रुवारीला लागणार ‘लग्नाचा शॉट’

**छत्रपती संभाजीनगर, दि.२० डिसेंबर :** लग्नातील गोंधळ, गैरसमज आणि अनपेक्षित घडामोडींवर आधारित हलकाफुलका मराठी चित्रपट ‘लग्नाचा शॉट’ येत्या ६ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे. नुकत्याच सादर झालेल्या मोशन पोस्टरमधून चित्रपटाचा मजेशीर आणि मनोरंजक टोन स्पष्ट होत असून, लग्नाच्या धावपळीतून निर्माण होणाऱ्या गंमतीदार प्रसंगांवर चित्रपटाची कथा केंद्रित आहे. दिग्दर्शक अक्षय गोरे यांच्या मते, हा चित्रपट कोणताही संदेश देण्याचा आग्रह न धरता संपूर्ण कुटुंबासाठी स्वच्छ, हलके आणि प्रामाणिक मनोरंजन देणारा अनुभव आहे. कलाकारांची नावे अद्याप गुप्त ठेवण्यात आली असली तरी चित्रपट प्रेक्षकांना भरपूर हसवणार, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. महापर्व फिल्म्स निर्मित आणि जिजा फिल्म्स यांच्या सहयोगाने साकारलेल्या या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन अक्षय गोरे यांनी केले आहे. संगीत प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांचे असून, अक्षय महादेव गोरे, विजय महादेव गोरे, अभिषेक उत्कर्ष कोळी आणि सुरेश मंगललाल प्रजापती हे निर्माते आहेत.

# दुचाकी वाहन दुरुस्ती प्रशिक्षणासाठी मुलाखत कार्यक्रम संपन्न



**तभा.वृत्तसेवा**

**कन्नड, दि.२० डिसेंबर :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कन्नड तालुक्यातील अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी दुचाकी वाहन दुरुस्ती या एक महिन्याच्या प्रशिक्षणासाठी मुलाखत कार्यक्रम चाळीसगाव रोडवरील आदिवासी मुलांचे वस्तीगृह येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रास्ताविकात शाश्र्वत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, चापानेरचे सचिव अतुल धाडबळे यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण हे हिरो शोरूम येथे घेण्यात येणार असल्याची माहिती दिली. उद्योजकता विकास केंद्राच्या जिल्हा प्रकल्प अधिकारी भारती सोसे यांनी दुचाकी वाहन दुरुस्ती प्रशिक्षणाची उद्दिष्टे, प्रशिक्षणाची रूपरेषा तसेच स्वयंरोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे जाधव, हेल्पिंग ह्युमन ग्रामीण व सेवाभावी संस्थेचे योगेश अंभोरे, उपस्थित होते. या मुलाखत कार्यक्रमाला सुमारे ४९ ते ५५ युवक व युवती उपस्थित होते.

# पारदर्शक प्रशासनासाठी दस्तऐवजावर क्यू आर कोड आणि युनिक आयडी

**छत्रपती संभाजीनगर, दि. १९ :** जिल्हा प्रशासनाने सुशासन सप्ताह अभियानांतर्गत विकसित केलेली दस्तऐवज पडताळणी सुविधा ही एक सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित प्रणाली आहे. हा उपक्रम जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला आहे.

या प्रणालीमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी णीशी खऊ व झर्रीीव आधारित सुरक्षित लॉगिनची सुविधा उपलब्ध आहे. संबंधित शासकीय अधिकारी लॉगिन करून निर्गमित होणाऱ्या दस्तऐवजांना युनिक आयडी व क्यूआर कोड मॅप करतात. हा युनिक आयडी व ठठ कोड त्या दस्तऐवजाची ओळख व सत्यता सुनिश्चित करतो.

नागरिक तसेच इतर शासकीय कार्यालये संबंधित पोर्टलवर दस्तऐवजावरील क्यूआर कोड स्कॅन करून किंवा युनिक आयडी प्रविष्ट करून संबंधित दस्तऐवजाची त्वरित पडताळणी करू शकतात. यामुळे तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या विविध आदेश, प्रमाणपत्रे व इतर शासकीय दस्तऐवजांची खात्रीशीर तपासणी सुलभ होते.

ही सुविधा नागरिक व शासकीय कार्यालयांना वेळेत व अचूक दस्तऐवज पडताळणी करण्यास मदत करते. बनावट, फेरफार केलेले किंवा संपादित दस्तऐवज ओळखून त्यापासून होणारे गैरप्रकार, फसवणूक व पुढील कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरत असून, प्रशासनातील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. जिल्हा प्रशासन अंतर्गत होणाऱ्या महसूल आणि इतर विभागाअंतर्गत होणारा पत्रव्यवहार तसेच यातून विविध कागदपत्रे प्रमाणपत्रे नागरिकांना वितरित केले जातात हे वितरित करत असताना त्याचे प्रमाणिकीकरण ओळखण्यासाठी क्यू आर कोड द्वारे वेगळी ओळख कायमस्वरूपी देण्यात येणार आहे.

## ‘लेट्स किक स्टार्ट’चे आयोजन

**नाशिक :** दिल्ली पब्लिक स्कूलने १० ते १३ डिसेंबर दरम्यान प्रीस्कूल इंटरस्कूल फुटबॉल लीग, 'लेट्स किक स्टार्ट' यशस्वीरित्या आयोजित केले, ज्यामुळे उत्साह, ऊर्जा आणि खऱ्या खेळाच्या भावनेने भरलेले वातावरण निर्माण झाले. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध शाळांमधील ३७ संघांचा सहभाग दिसून आला, ज्यामुळे तरुण विद्यार्थ्यांना संघटित खेळांची सुरुवातीची ओळख झाली. मुलांनी संपूर्ण सामन्यांमध्ये उल्लेखनीय आत्मविश्र्वास, टीमवर्क, समन्वय आणि आनंदी भावना प्रदर्शित केली. सुव्यवस्थित लीगचा उद्देश सहाय्यक आणि उत्साहवर्धक वातावरणात शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि निरोगी स्पर्धेला प्रोत्साहन देणे हा होता.



# सोयगाव येथे संत गाडगेबाबांना अभिवादन

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.२० डिसेंबर :** सोयगाव शहरातील संत गाडगेबाबा चौक येथे राष्ट्रसंत, स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा यांची ६९ वी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संपत मंडवे हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.यावेळी रामराव रोकडे, आन्ना जाधव, कृष्णा शेवाळकर, दत्तू रोकडे, संतोष महाले, सुनिल रोकडे, बबन रोकडे, योगेश रोकडे, अनिल निकुंम, गोकुळ रोकडे, बापू महाले, प्रा.अनिल मानकर,नगरसेवक हर्षल काळे, कदीर शहा, सुनिल काळे, राजेंद्र दुतोंडे, योगेश बोखारे, सुनिल निकम, समाजसेवक संदिप चौधरी, सुरेश घन, ज्ञानेश्वर गाडेकर, पत्रकार, व्यापारी वर्ग व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

## अग्रलेख...

# संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. शेवटच्या दिवशी विरोधकांनी नेहमीप्रमाणे गोंधळ घालून 'हम नहीं सुधरेंगे' हे दाखवून दिले. तरीही अन्य अधिवेशनाच्या तुलनेत यावेळचे अधिवेशन अतिशय उत्पादक ठरले. अनेक महत्त्वाची विधेयके सरकारला पारित करून घेता आली; तसेच राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक विषयांवर सभागृहात चर्चाही झाली. विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे अधिवेशनाला काही प्रमाणात गालबोट लागले; तरीही यावेळचे अधिवेशन आतापर्यंतच्या अन्य अधिवेशनाच्या तुलनेत छोटे असूनही अतिशय चांगले झाले. संसदेच्या अधिवेशनाचा उद्देश राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि जनतेच्या जिव्हाळ्याच्या मुद्यांवर दोन्ही सभागृहांत चर्चा व्हावी हा असतो. आजकाल विरोधकांना अभ्यासपूर्ण चर्चेत नाही तर सभागृहात गोंधळ घालण्यात रुची असते, असे वाटते. मुळात प्रश्न सोडवण्यासाठी जनतेने आपल्याला निवडून दिले आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या बहुतेक सदस्यांना उरले नाही. सरकार चुकत असेल, जनतेच्या हिताच्या विरोधातील निर्णय घेत असेल तर त्याला आक्रमकपणे विरोध करण्याचा विरोधकांना अधिकार आहेच; हा अधिकार कोणी नाकारू शकत नाही. चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या सरकारला योग्य मार्गावर आणणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. पण आपण विरोधी पक्षात आहोत म्हणून ऊठसूठ सरकारला नाहक विरोध करणे, सरकारने व्यापक देशहिताच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयाला विरोध करणे योग्य नाही. आजचा विरोधी पक्ष आपली दिशा हरवून बसला आहे, त्यामुळे त्याची सभागृहात आणि बाहेरही कशी दशा होत आहे हे दिसते आहेच. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधक उपस्थित करत असलेल्या सर्व विषयांवर चर्चा करण्याची आमची तयारी असल्याचे सरकारने स्पष्ट केले होते. मतदारयादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावर सरकारने चर्चा करावी, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली होती. या विषयावर सरकार चर्चा करणार नाही, असा विरोधकांचा होरा होता. पण सरकारने या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत विरोधकांच्या हल्ल्यातील हवा काढून घेतली. एसआयआरवरील चर्चेचे निमित्त करत दोन्ही सभागृहांत गोंधळ घालायचा आणि हिवाळी अधिवेशनाचे कामकाज हाणून पाडायचे, अशी विरोधकांची व्यूहरचना होती; पण या विषयावर चर्चेची तयारी दर्शवत सरकारने ती व्यूहरचना हाणून पाडली. एसआयआरवर संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोन दिवस चर्चा झाली. या चर्चेत सर्व पक्षांच्या सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली. एसआयआर हे एका विशिष्ट समाजाच्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी आहे, असा अपप्रचार विरोधकांनी चालवला होता. एसआयआरवर विरोधक उपस्थित करत असलेल्या आक्षेपांना गृहमंत्री अमित शाह यांनी दोन्ही सभागृहांत अतिशय मुद्देसूद आणि अभ्यासपूर्ण उत्तर दिले.

या देशात अवैध मार्गाने घुसखोरी केलेल्यांना हुडकून काढण्यासाठी एसआयआर आहे. देशातील कोणत्याही जातिधर्माच्या लोकांना लक्ष्य करण्याचा यामागचा हेतू नाही, असे अतिशय समर्पक उत्तर देत अमित शाह यांनी विरोधकांच्या आक्षेपांतील हवा काढली. या देशाचा पंतप्रधान आणि राज्यांचा मुख्यमंत्री कोण होणार हे ठरवण्याचा अधिकार घुसखोरांना आम्ही देऊ शकत नाही, तर तो अधिकार या देशातील मतदारांचा आहे, हा शाह यांचा युक्तिवाद अतिशय बिनतोड असा होता. एसआयआरमधून एका विशिष्ट समाजाच्या नागरिकांना लक्ष्य करण्याचा सरकारचा हेतू असता तर बिहारच्या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दणदणीत विजय मिळाला नसता. कारण बिहारमध्ये मुस्लिम समाजानेही भाजपाला भरभरून मतदान केले आहे. वंदे मातरम्‌ला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संसदेत अतिशय अभ्यासपूर्ण चर्चा झाली. वंदे मातरम्‌वरील चर्चेत लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण सर्वोत्कृष्ट म्हणावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या तुलनेत लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपला प्रभाव पाडू शकले नाहीत. राहुल गांधींजवळ वक्तृत्व नाही, मांडणी नाही आणि त्यांचा अभ्यासही फारसा नाही. एकेकाळी विरोधी पक्षनेता भाषणासाठी उभा झाला तर सत्ता पक्ष अस्वस्थ होत असे. पण आता विरोधी पक्षनेता म्हणजे राहुल गांधी भाषणासाठी उभे झाले की, सभागृहातील वातावरणातील गांभीर्य कमी होते. एसआयआर व मतचोरीच्या मुद्यावरून राहुल गांधी वारंवार निवडणूक आयोग आणि सरकारला घेरत होते, पत्रपरिषद घेत आरोप करत होते. पण एसआयआरवरील चर्चेत राहुल गांधी यांचे भाषण काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची निराशा करणारे होते. आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ कोणताही ठोस पुरावा ते सादर करू शकले नाहीत. याचा दोष अमित शाह यांनी भोळ्याभाबड्या राहुल गांधींवर न टाकता त्यांना भाषण लिहून देणाऱ्या चमूवर टाकला. असे करत शाह यांनी एका दगडात दोन पक्षी मारले. त्यांना भाषण लिहून देणारे लोक कमी क्षमतेचे आहेत, असा शालजोडीतला टोला त्यांनी मारला. राहुल गांधी यांच्यापेक्षा प्रियांका वढेरा या जास्त प्रभावी असल्याचे या अधिवेशनात दिसून आले. राहुल गांधी यांना हटवून काँग्रेस पक्षाचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी काँग्रेस पक्षात अधूनमधून उगीच होत नाही. भाजपा जेव्हा विरोधी पक्षांत होता, तेव्हा अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराजसारखे दिग्गज नेते विरोधी पक्षनेते होते. हे नेते भाषणासाठी उभे होत तेव्हा सत्ताधारी पक्षाला घाम फुटत असे. आता राहुल गांधी भाषणासाठी उभे राहिले की, ते काय बोलणार, आपल्याच पक्षाला तर अडचणीत आणणार नाही ना, याचा विचार करून काँग्रेसच्या सदस्यांनाच घाम फुटतो. राहुल गांधींनी विरोधी पक्षनेता म्हणून सरकारला अडचणीत आणण्यापेक्षा आपल्याच पक्षाला अडचणीत आणण्याचे काम इमानेइतबारे अनेकदा केले आहे. हिवाळी अधिवेशनात मनरेगाऐवजी सुधारित जी राम जी विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. या विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. मनरेगा योजनेतून महात्मा गांधी यांचे नाव वगळण्याचा सरकारचा हेतू असल्याचा आरोप काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केला. खरे तर महात्मा गांधी यांच्या सिद्धातांची आणि आदर्शाची हत्या काँग्रेसने अनेकदा केली आहे. तरीही या विधेयकावरील मतदानाच्या वेळी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात जो गोंधळ घातला, त्याचा करावा तेवढा निषेध कमी आहे. सांसदीय परंपरा काँग्रेसच्या सदस्यांनी पायदळी तुडवल्या, विधेयकाची प्रत फाडत त्याचे तुकडे सभापतींच्या आसनाच्या दिशेने भिरकावण्यात आले. विधेयकावर झालेल्या चर्चेला उत्तर देणे ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांना कठीण झाले होते. त्यामुळे त्यांना आपली जागा सोडून पाठीमागे जावे लागले आणि भाषण पूर्ण करावे लागले. मात्र या गदारोळातही चौहान यांनी विरोधकांच्या आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद निराकरण केले. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या या बेशिस्त आचरणाबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन् यांना तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करावी लागली. फक्त नाराजी व्यक्त करणे पुरेसे नाही. अशा सदस्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आपल्या अशा वागणुकीबद्दल आत्मचिंतन करण्याची गरज आहे. देशातील जनता आपल्याला वारंवार का नाकारते आहे, याचे कारण काँग्रेसने शोधले पाहिजे आणि आपल्या वागणुकीत सुधारणा केली पाहिजे. काँग्रेस सदस्यांची ही हताशा आणि निराशा ते ११ वर्षांपासून सत्तावंचित झाल्यामुळे आहे. महत्त्वाचे म्हणजे आता आपण कधीच सत्तेवर येऊ शकत नाही, याची खात्री काँग्रेसला असावी असे त्यांच्या दोन्ही सभागृहांतील वर्तनावरून दिसून येते. याआधी भाजपाही अनेक निवडणुका हरली होती, पण ती कधीच हताश आणि निराश झाली नव्हती. मात्र काँग्रेसने आपला आत्मविश्वास पूर्णपणे गमावला आहे. काँग्रेसने आपल्या वागणुकीत आणि नेतृत्वात बदल केला नाही तर काँग्रेसची स्थिती आणखी दयनीय झाल्याशिवाय राहणार नाही, हाच संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा शोध आणि बोध आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव?

''शुक पंजरि वा हरीण शिरावा पाशी, ही फसगत झाली तैशी.'' म्हणजे ज्याप्रमाणे राघू पिंजऱ्यात अडकतो किंवा हरिण जाळ्यात सापडतं, त्याप्रमाणे मराठी माणसाची फसगत झाली आहे, हे सुरुवातीलाच नमूद करू इच्छितो. आता तुम्ही विचाराल की ही फसगत केली कुणी? आणि झाली कशी व ती फसगत नेमकी आहे तरी काय? याचंही विवेचन पुढे करणार आहे. महाराष्ट्र धर्म हा शब्द समर्थ रामदासांनी दिला. दोन ठिकाणी प्रामुख्याने 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द आढळतो. ''मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।'' हे उपदेशपर वचन आहे. दुसऱ्यांदा हा उल्लेख सापडतो, जेव्हा समर्थांनी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना पत्र लिहिलं, त्यात ते श्रीमंत योगी, जाणता राजा अशाप्रकारे शिवाजी महाराजांची स्तुती करत म्हणतात, ''या भूमंडळाचें ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥'' या महाराष्ट्रधर्म शब्दावरून आज प्रचंड मोठं राजकारण खेळलं जात आहे. गंमत म्हणजे समर्थांवर त्यांची जात पाहून टीका करणारेही महाराष्ट्रधर्म या शब्दाचा उच्चार करतात. आता मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जवळ आलीय. त्यामुळे आपल्याला काही ठेवणीतली वाक्ये ऐकायला मिळत आहेत. त्यातलं सर्वात जुनं आणि लोकांची फसगत करण्यासाठी परंपरागत वारपलं जाणारं वाक्य म्हणजे, ''हा मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे.'' प्रत्येक प्रांतातली काही प्रादेशिक अस्मिता असते, त्या अस्मितेला आव्हान देणारी विधाने केली तर स्थानिक जनता आकर्षित होते. हा एक डाव आहे. हे एक जाळं आहे!

१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. काँग्रेसला मुंबई महाराष्ट्राला देऊ नये, असे वाटत होते. यासाठी मोठे आंदोलन झाले. १०५ हुतात्म्यांनी बळी देऊन हे आंदोलन यशस्वीही केले. मात्र मुंबई केंद्रशासित करण्याची भीती अनेक वर्षे मराठी माणसाला दाखवण्यात आली. लहान मुलाने घास घेतला नाही, तर मोठी माणसं बुवा आला म्हणून घाबरवतात. त्याचप्रमाणे निवडणूक आल्यावर मराठी माणसाने आपल्यालाच मतदान करावे, या हेतूने ''मुंबई तोडण्याचा डाव आहे'' म्हणत भीती दाखवली जाते. १९६० साली ही परिस्थिती खरोखर होती हे नाकारता येत नाही. पण आता परिस्थिती बदललेली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्राचे नेते तर बुलेट ट्रेनसारख्या विकासकामांनाही विरोध करत हा मुंबई तोडण्याचा डाव म्हणतात. मराठी अस्मितेच्या मुद्यावरून राजकारण करणाऱ्या



नेत्यांनी या एका वाक्याच्या बळावर ''बंगले'' बांधले. पण मराठी माणूस मुंबईच्या बाहेर फेकला गेला. मुंबईतील मराठी टक्केवारी कमी होण्याचे कारण आर्थिक आहेच पण घराचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. आता मुंबईत घरांच्या किमती खूप वाढल्या आहेत आणि सरासरी किंमत प्रति स्क्वेअर फूट ११,००० ते २४,००० रुपये आहे. एक १ बीएचके फ्लॅट ६० लाखांपासून सुरू होतो, तर प्रीमियम भागात १.५ कोटींपर्यंत जातो. लक्झरी घरांच्या किमती ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. मराठी निम्न किंवा मध्यमवर्गीय माणूस या किमतींमुळे घर विकत घेऊ शकत नाही. परवडणाऱ्या घरांच्या योजना अस्तित्वात असल्या तरी त्या अपुऱ्या आहेत. यासाठी कोणी प्रयत्न केलेले दिसत नाही. दुसरी गोष्ट, कितीही नाही म्हटलं तरी मुंबईत अन्य राज्यांतून येणाऱ्या कामगारांची संख्या प्रचंड आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी म्हणता म्हणता इथे अनेक लोक आजही येत आहेत. ही समस्या आहे, हे मान्य करून आपल्याला पुढे जावे लागणार आहे. हा भार या इवल्याशा शहरावर पडतोच आहे. पण त्याची कारणे वेगळी आहेत. त्यावर काम करायला हवे. मात्र मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते अशा महत्त्वाच्या विषयांना प्रांतीय वादाचे स्वरूप देतात. पण अशा लोकांचे संबंध अनेक वर्षे मराठी न बोलता येणाऱ्यांशी असतात. हेही लक्षात घेतले पाहिजे.

मराठी भाषा ही समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, समर्थ रामदास यांनी साहित्यात मोलाचा वाटा दिला आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे या वारशाचे रक्षण. पण आज मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत आहेत आणि इंग्रजीचा प्रभाव वाढला आहे. हा मुद्दा मराठीचे कैवारी हाती का घेत नाहीत. कारण त्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात. त्यांची नातवंडे इंग्रजी शाळेत शिकणार आहेत. मग हे भाषेचे डोस सामान्य माणसाला का? आधी केले मग बोलले या संतांच्या वचनाप्रमाणे त्यांनी वागायला नको का? आता महाराष्ट्रधर्म या समर्थांनी दिलेल्या दिव्य शब्दाकडे येऊया. महाराष्ट्रधर्म हा काही स्वतंत्र धर्म नाही. हिंदू धर्माचे मराठी रूप आहे. समर्थ लिहितात, ''तीर्थक्षेत्रे ती मोडिलीं । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट जाली । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ देव, धर्म, गोब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली'' मग हे सांगत पुढे समर्थ लिहितात, ''उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायी ॥ या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा कारिणे ॥'' याचा अर्थ इतका स्पष्ट आहे की समर्थ छत्रपतींना धर्मरक्षक म्हणतात. समर्थ आनंदवनभुवनी या काव्यात लिहितात, ''बुडाले सर्व ही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनी'' तसेच ''बुडाला औरंग्या पापी । म्लेंछसंहार जाहला । मोडलीं मांडली छेत्रें । आनंदवनभुवनी ।'' इथे समर्थ ''हिंदुस्थान, म्लेंछसंहार, औरंग्या'' असे शब्द वापरतात. म्हणजे समर्थ रामदासांची भावना किती उदात्त आहे पाहा. छत्रपती शिवाजी महाराज हे परकीय शक्तींचा नायनाट करत आहेत, असं समर्थ म्हणत आहेत. त्यामुळे समर्थांनी दिलेला महाराष्ट्रधर्म हा शब्द प्रांतीय नसून राष्ट्रीय आहे. महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे हे सावरकरांचे विचार आहेत. हेच समर्थ रामदास वेगळ्या शब्दांत मांडतात. त्यामुळे मुंबईच्या काही स्वतंत्र समस्या आहेत. मराठी माणसाच्याही काही समस्या आहेत. या स्वतंत्रपणे कोणाचाही द्वेष न करता सोडवल्या पाहिजेत. मराठी माणसाचे अर्थकारण, त्याच्यासाठी स्वस्तातली घरे, मराठी शाळा, महाराष्ट्रात मराठी भाषा बोलण्यास प्रोत्साहन असे अनेक विषय घेऊन त्याबद्दलच्या समस्या स्वतंत्रपणे सोडवता येतील. त्यासाठी अभ्यास करावा लागेल. पण स्वतःला मराठीचे कैवारी म्हणवून घेणारे राजकीय नेते स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मराठी माणसाची माथी भडकावत आहेत. आता कुणीही मुंबई महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही किंवा वेगळी करू शकत नाही, हे मराठी माणसाने लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच मराठी माणसाने शुक म्हणजे राघू किंवा हरिण बनून यांच्या जाळ्यात अडकू नये.


writerjayeshmestry@gmail.com


## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# प्रत्येक गावात असावा असा 'भोंगा'

आजचा काळ हा आवाजांचा आहे. रस्त्यावर हॉर्नचा गोंगाट, घराघरांत टीव्ही, मोबाईल, सोशल मीडियाच्या नोटिफिकेशनची टिंग टिंग म्हणजे थोडक्यात भोंगा! याशिवाय राज्याच्या राजधानीत सकाळी ९ चा भोंगा अशी राजकीय ओळख असलेले खासदार संजय राऊत यांचा भोंगा! अनेकदा वाजला याचा भोंगा असेही उपरोधिकपणे म्हटले जाते. काही भोंग्यांवर बंदी आणण्याची मागणी राज ठाकरे वारंवार करतात. भोंग्यांचे अनेक प्रकार आहेत. पण, आजचा भोंगा खऱ्या अर्थाने वेगळाच आहे. हा भोंगा वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारा आहे. भोंग्याच्या या आख्यायनात पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील 'अग्रज धुळगाव!' या गावाचा उल्लेख करावा लागेल. या गावात सकाळ, सायंकाळी वाजणारा भोंगा राजकीय नव्हे तर अभ्यासाचा! येथे गेल्या ३ वर्षांपासून पहाटे ५ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता भोंगा वाजतो. भोंगा वाजताच गावातील टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला ठेवले जातात अन् विद्यार्थी अभ्यासाला बसतात. या अभिनव संकल्पनेने या गावाची ओळख आता 'भोंग्याचे गाव' अशी झाली आहे. यातून गावकऱ्यांतील एकी दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल झाले. त्यांची गुणवत्ताही वाढल्याने गावातील ५३ विद्यार्थी नॅशनल स्कॉलरशिपसाठी पात्र ठरले. दहावीतही ते अव्वल ठरत आहेत. अनेक विद्यार्थ्यांची अनेक स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून निवड झाली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतच्या वतीने राबवल्या जात असलेल्या उपक्रमाचे गावकरी १०० टक्के पालन करतात. गावातील काही सुशिक्षित व्यक्ती दररोज ३० ते ४० घरी भेट देऊन पाहणी करतात. विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक अडचण आल्यास ती सोडवण्यासाठी मदतही करतात. पहाटे ५ ते ७ आणि सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा उपक्रम दररोज राबवला जातो.

आज जिथे शाळा, शिकवणी वर्ग (सॉरी कोचिंग क्लासेस) आणि अभ्यासाची महागडी साधनं असूनही मुलं अभ्यासापासून दूर जात असताना अग्रज धुळगावने एक वेगळा आदर्श ठेवला आहे. आपण धूळ या शब्दालाच नाक मुरडतो! पण, ज्या गावाच्या नावातच धूळ आहे. त्यांनी अभ्यासाची धूळ झटकून टाकण्याचा हा विडा उचलला असून ते त्यासाठी 'अग्रज' ठरले आहेत. अग्रज म्हणजे 'मोठा' आणि या अभियानात त्यांनी मोठ्याची भूमिका बजावली असे म्हटल्यास वावगे ठरू नये! इच्छाशक्तीच्या बळावर भोंग्याने क्रांती घडवली, असेच म्हणावे लागेल. या उपक्रमाचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे तो केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित नाही तर या भोंग्याच्या आवाजात संपूर्ण गाव सहभागी आहे. भोंगा वाजताच टीव्ही बंद होतात, मोबाईल बाजूला जातात. त्यामुळे त्या भोंग्याने लहान मोठ्यांना एक दिशा दिली आहे. सध्या मुलं ऐकत नाहीत, अभ्यास करीत नाहीत. मोबाईलचे वेड लागले आहे, असे लहान मोठ्या, शिक्षित, अशिक्षित घरांमधली एकच कम्प्लेंट! अग्रज धुळगावने या प्रश्नावर जालिम उत्तर शोधून काढले आहे. सकाळ आणि सायंकाळच्या ४ तासातच गावात एक ऊर्जा निर्माण होते नव्हे सरस्वती प्रत्येक घरात डोकावल्याशिवाय राहत नसेल. इथे मुलांना अभ्यास कर असे म्हटले जात नाही. त्यांना अभ्यास करता येईल असे वातावरण गावाने दिले आहे. या भोंग्याचा आवाज केवळ कानांवर पडत नाही तो मनावर परिणाम करतो. तो विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याची आठवण करून देतो. या उपक्रमामुळे गावात हळूहळू बदल दिसू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी बदलत आहेत. मोबाईलवर घालवला जाणारा वेळ कमी होतो आहे. टीव्ही पाहण्याची सवय मर्यादित होते आहे. परीक्षांचे निकाल सुधारत आहेत. पण याहूनही महत्त्वाचं म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आहे. मंदिरे, व्यक्ती, व्यक्तिमत्त्व, वस्तू, निसर्ग, आंदोलनं, वाद, गुन्हे आदींसाठी देशात अनेक गावे ओळखली जात असताना महाराष्ट्रातील अग्रज धुळगाव हे गाव अभ्यासासाठी ओळखले जात आहे. आज देशभरात 'शांतता क्षेत्र', 'नो हॉर्न झोन' अशा संकल्पना राबवल्या जातात. पण अग्रज धुळगावने 'अभ्यास क्षेत्र' निर्माण केलं आहे. जिथे आवाज बंद होतो आणि विचार सुरू होतात. गावागावात इतर भोंगे वाजल्यापेक्षा वा वाजवल्यापेक्षा प्रत्येक गल्लीत, गावात, शहरात असा भोंगा वाजला तर?


९८८१९०३७६५


## दखल

**मुकुंद गायकवाड**

# तांदूळ निर्यातीला वेसण कशासाठी?

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, त्याला व्यापकपणे शुल्कयुद्ध म्हटले जाते, तो काळ राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्याला न बधलेल्या भारताला त्यांनी एका नवीनच मुद्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डम्पिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने (तांदळाचे) डम्पिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची



घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डम्पिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर (विशेषतः दक्षिण आशियाई समुदायावर) आधारित आहे. धान्य किंवा इतर कृषी उत्पादनांच्या संदर्भात डम्पिंग म्हणजे निर्यातदार देश किंवा कंपनीने आपले उत्पादन संबंधित देशांतर्गत बाजारातील किमतीपेक्षा कमी दराने विकणे. अशा देशात धान्य आयात करणाऱ्या देशात उत्पादनाची किंमत किंवा उत्पादन खर्च तुलनेने जास्त असतो. (जे शेतीच्या बाबतीत अनेकदा सर्वांत प्रभावी स्वरूप असते). गेले दोन महिने ट्रम्प हे सारखे अहंपणाची भाषा वापरून भारतावर काही ना काही लादण्याची गरळ ओकत आहेत. वास्तविक, या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची बाजू भक्कम झाल्याचे सहज समजू शकते. कारण अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर आजवर जगाची अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टेरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. याची दखल माध्यमांनी आणि तज्ज्ञ लोकांनी घेऊन पंतप्रधान मोदींची पाठ थोपटायला हवी होती, परंतु आर्थिक अभ्यासाअभावी ही महत्त्वाची बातमी दुर्लक्षित राहिली. तसा विचार करता गहू आणि तांदूळ ही दोन्ही पिके अनुक्रमे इजिप्त आणि चीनमध्ये निर्माण झाली होती. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उपतवल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरयाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात.

इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे, परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्रायलचा शेतकरी सधन झाला आहे. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते. शेतीक्षेत्रामध्येच नव्हे, तर अनेक क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे. परंतु व्हिएतनामच्या हो चीनिव्ह यांनी शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा वापर करून अमेरिकेला दाती तृण धरून शरण यायला भाग पाडले होते. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही. भारतीय शेतकरी आणि केंद्र सरकार याबाबतीत निश्चितच अभिनंदनास पात्र ठरतात.

(लेखक ज्येष्ठ कृषितज्ज्ञ आहेत.)

## आजचे संघगीत-७८

शनिवार, २० डिसेंबर २०२५

### माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते

माते मंगलमय माते देई आशीर्वचनाते
वंदनीय तू पूजनीय तू वरदायिनी माते ॥धृ॥

तुझ्या वैभवी अमुचे वैभव
तव सन्माने अमुचा गौरव
स्फूर्ति प्रेरणा देई अभिनव जग उजळायाते ॥१॥

सभोवती शस्त्रांची खणखण
क्रुर रिपूंचे असुरी वर्तन
तुझ्या रक्षणी स्वधर्मरक्षण जागवु ईर्ष्यते ॥२॥

दुष्ट मतलबी घरभेद्यांचे
डाव उधळवू आव्हानांचे
चढू हिमालय कर्तृत्वाचे तुझ्या पूजनाते ॥३॥

प्रबळ उभारू अविचल भक्ती
प्रलयंकारी अजेय शक्ती
तुझ्या कारणी जीवन मुक्ती एकच आम्हाते ॥४॥

अपूर्ण केवळ अमुचे जीवन
चिरवांछित परि ध्येय चिरंतन
याच देहि ते अमुचे हातुन ने पूर्णत्वाते ॥५॥

## एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब


पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षाच्या तृणमूल काँग्रेसचे आमदार मदन मित्रा यांच्या वादग्रस्त वक्तव्याने देशभरात चर्चा आणि वाद निर्माण झाला. भगवान रामांविषयी केलेले विधान केवळ एक वैयक्तिक मत म्हणून न राहता, समाजातील श्रद्धा, इतिहास आणि राजकीय संवेदनशीलता यांना स्पर्श करणारे आहे. भारतीय संस्कृतीत श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचेच नव्हे, तर नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. अशा व्यक्तिमत्त्वाबाबत केलेली कोणतीही सार्वजनिक टिप्पणी ही अत्यंत जबाबदारीने करायला हवी. या वक्तव्यावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, अशा विधानांमुळे भारतीय इतिहास व सांस्कृतिक परंपरेचा अवमान होतो. यामागे केवळ व्यक्तिगत अज्ञान नसून, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब दिसते. याच पृष्ठभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया न आल्याने, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि मौन याविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, संबंधित आमदारांनी आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, सार्वजनिक व्यासपीठावरून केलेल्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजमनावर त्याचा खोल प्रभाव पडतो, हे विसरून चालणार नाही. राजकारण करताना श्रद्धा, इतिहास आणि समाजभावना यांचा आदर राखणे ही केवळ अपेक्षा नव्हे, तर लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### दिल्लीतील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

दिल्लीमध्ये १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव भारत मंडपम् येथे उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम आपली संस्कृती, इतिहास आणि जुन्या काळातील शौर्याची आठवण करून देण्यासाठी आयोजित केला होता. या महोत्सवात सर्वांत जास्त लक्ष वेधून घेतले ते म्हणजे पारंपरिक भारतीय युद्धकलांनी. यामध्ये आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या कलांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमात तलवारबाजी, लाठी-काठी आणि दांडपट्टा यासारख्या खेळांची थरारक प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. शिवकाळात मावळे ज्या प्रकारे युद्ध खेळायचे, त्याचे जिवंत दर्शन तेथे घडले. तेथे ऐतिहासिक शस्त्रांचे एक मोठे प्रदर्शन भरवले होते. यामध्ये जुन्या काळातील सुमारे २५० हून अधिक शस्त्रे पाहायला मिळाली. ही शस्त्रे पाहून आपल्या इतिहासाचा अभिमान वाटत होता. केवळ खेळ म्हणून नाही, तर स्वतःचे संरक्षण करण्यासाठी




आणि शिस्त लावण्यासाठी या प्राचीन कला आजही किती महत्त्वाच्या आहेत, हे लोकांना समजावून सांगण्यात आले. दोन दिवसांच्या या सोहळ्यात भारताची संस्कृती आणि परंपरा कशी टिकवता येईल, यावर अनेक जाणकारांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम म्हणजे आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारा एक प्रयत्न होता. तरुण पिढीला आपल्या इतिहासाची माहिती मिळावी, हा त्यामागचा मुख्य हेतू होता. थोडक्यात सांगायचे तर, हा सोहळा भारतीय संस्कृतीचा आणि शौर्याचा अभिमान जागवणारा एक मोठा कार्यक्रम ठरला.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिंतूर पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपी सुटला

**आरोपीतर्फे ॲड. सुनिल बुधवंत यांनी वापरला डिफॉल्ट बेल चा अधिकार**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल सुमारे ८८ लाख रुपये किंमतीच्या विदेशी दारू लंपास प्रकरणातील मुख्य आरोपी प्रभाकर विश्वनाथ घुगे यास दि. १९ डिसेंबर २०२५, शुक्रवार रोजी जिंतूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी डिफॉल्ट जामीन मंजूर केला.

आरोपीने त्याच्या साथीदारांच्या संघटित टोळीच्या मदतीने तब्बल अठ्ठ्याऐंशी लाखांची विदेशी दारू तथाकथितरित्या लंपास केल्या प्रकरणी दि. ०८ सप्टेंबर रोजी जिंतूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झाला होता. त्यानंतर, जिंतूर पोलिसांनी आरोपी प्रभाकर यास १९ सप्टेंबर रोजी अटक करून, त्याच दिवशी जिंतूर येथील मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले होते. सुरुवातीच्या पोलीस कोठडी नंतर तो न्यायालयीन कोठडीत म्हणजेच परभणी येथील कारागृहात बंदिस्त होता. यादरम्यान, पोलिसांनी जवळपास मकोका सारखेच असणारे भारतीय न्याय संहितेतील गंभीर कलम १११ लावले होते, त्यामुळे प्रकरणाचा तपास पूर्ण करून १९ सप्टेंबर पासून नव्वद दिवसांच्या आत चार्जशीट म्हणजेच दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करणे आवश्यक होते. परंतू या मुदतीत पोलिसांनी दोषारोप पत्र दाखल न केल्यामुळे, आरोपीतर्फे ॲड. सुनिल बुधवंत यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १८७(३) अंतर्गत जिंतूर येथील न्यायालयात डिफॉल्ट जामिनाचा अर्ज सादर केला. सदरील अर्जावर त्यांनी युक्तिवाद करताना, पोलिसांनी मुदतीत दोषारोप पत्र दाखल केले नसल्यामुळे, आरोपीला डिफॉल्ट जामिनाचा हक्क प्राप्त झाला असून त्याला जामिनावर सोडावेच लागते असा कायदेशीर मुद्दा मा. न्यायालयासमोर मांडला. सरकारी वकिलांनी सुद्धा या मुद्द्यावर बाजू मांडली. यानंतर, मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जिंतूर यांनी ॲड. सुनिल बुधवंत यांचा युक्तिवाद स्विकारून आरोपीस जामिनावर सोडण्याचे आदेशित केले. तसेच, या प्रकरणात कायदेशीर मुदतीत दोषारोप पत्र का दाखल केले नाही, याबाबत सात दिवसांत खुलासा सादर करावा अशी तपास अधिकाऱ्यांना नोटीस दिली आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १८७(३) नुसार पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केल्याच्या दिनांकापासून मुदतीत (जर शिक्षा १० वर्षांपर्यंत असेल तर ६० दिवसांच्या आत आणि शिक्षा त्यापेक्षा जास्त असेल तसेच जन्मठेप किंवा मृत्यूदंडाची शिक्षा असेल तर ९० दिवसांच्या आत) दोषारोप पत्र न्यायालयात सादर न केल्याच्या कसूरी मुळे आरोपीच्या झालेल्या जमानतीला डिफॉल्ट बेल म्हणतात.

## संक्षिप्त वृत्त...

### पालम तालुक्याच्या विकास कामाला सर्वप्रथम प्राधान्य देणार- सावंत

शांतीलाल शर्मा



**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या विकास कामाला सर्वप्रथम प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित गट विकास अधिकारी ऋषिकेश सावंत यांनी दि. १७ रोजी मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमाप्रसंगी बोलताना व्यक्त केले यावेळी उदय सिंह सिसोदे, आदींची उपस्थिती होती पुढे बोलताना सावंत म्हणाले की पालम तालुक्यातील राज्य व केंद्र शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना राबवण्याचे काम पंचायत समिती मार्फत अनेक वर्षापासून सुरू आहे हेच सुरू असलेले काम माझ्या माध्यमातून पारदर्शक पणाने तसेच विकास कामाला प्राधान्य देण्याची काम मी यापुढे करणार असून या कामात कुठल्याही अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा करू नये यासाठी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी यापुढे मला सहकार्य करत विकास कामाला प्राधान्य देणार असल्याचेही त्यांनी आयोजित करण्यात आलेल्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले यावेळी शांतीलाल शर्मा, राहुल कुमार गायकवाड, मारुती नाईकवाडे लक्ष्मण गायकवाड चांद तांबोळी आधी प्रमुख पत्रकार उपस्थित होते.

### डॉ. पंजाबराव देशमुख बहुजनांचे तारणहार..डॉ. चत्रभूज कदम



**मानवत,/प्रतिनिधी-** के. के. एम. महाविद्यालयात आज. डॉ. पंजाबराब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हूणन प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. चत्रभूज कदम, महात्मा फुले महाविद्यालय वरूड अमरावती,प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख, विज्ञान महाविद्यालय नागपूर,उपप्राचार्य डॉ.के.जी हुगे,पर्यवेक्षक प्रा.अनिल कापसे उपस्थित होते. कार्यक्रमाची रुपरेषा या संदर्भाबाबत डॉ. ओमराज देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते डॉ.चत्रभूज कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कीडॉ. पंजाबराव देशमुख (भाऊसाहेब देशमुख) हे एक थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ञ आणि शेतकरी नेते होते, ज्यांनी विदर्भात शिक्षणाचा प्रसार, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि सामाजिक समानता यासाठी मोठे कार्य केले; त्यांनी शिक्षणमंत्री, केंद्रीय कृषीमंत्री म्हणून काम केले आणि लोकविद्यापीठ, श्रद्धानंद वसतिगृह यांसारख्या संस्था स्थापन करून बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी योगदान दिले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. भास्कर मुंडे म्हणाले की शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी १९३२ मध्ये कर्जविमोचन कायदा आणला. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आणि कृषी विकासासाठी प्रयत्न केले. अशा महान समाज सुधारकाच्या जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. पंडित लांडगे यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य कर्मचारी व विध्यार्थी उपस्थिती होते.

### कोल्हावाडी शिवारात शेत आखाड्यावर बिबट्याचे दर्शन; भीतीचे वातावरण

**मानवत / प्रतिनिधी -** तालुक्यातील कोल्हावाडी शिवारात बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.अगदी गावाजवळ तुकाराम भिसे यांच्या आखाड्यावर तारेच्या कंपाउंड पर्यन्त बिबट्या आला होता , १८ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ७ वाजता दिसून आला. सदर आखाडा गावच्या स्मशानभूमीच्या अगदी लगत गावापासून ३०० मीटर अंतरावर असल्याने नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे.

बिबट्याच्या हालचालींनंतर गावकऱ्यांनी खबरदारी म्हणून रात्रभर जागून काढली. गावकऱ्यांनी आखाड्याकडे धाव घेतली , यावेळी आखाड्यावर दोन जण असल्याने ते घाबरून गेले होते, घटनास्थळी बिबट्याचे पायांचे ठसे स्पष्टपणे आढळून आले आहेत. या घटनेची माहिती तत्काळ वन विभागाला कळवण्यात आली असून, पुढील उपाययोजनांची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, नागरिकांनी रात्री बाहेर पडू नये, लहान मुले व पाळीव जनावरे सुरक्षित ठेवावीत.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यावर ५ हजारांचा दंड राज्य माहिती आयोगाचा जिंतूर तहसील कार्यालयाला दणका

**जिंतूर,/प्रतिनिधी:** माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करूनही वेळेत व योग्य माहिती न दिल्याप्रकरणी जिंतूर तहसील कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांच्यावर ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा दंड महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावला आहे.

जिंतूर तालुक्यातील मौजे मानमोडी येथील गट क्र ४३ मध्ये असलेल्या क्रेशर व दगड खदान मधून अवैद्य उत्खनन केल्या प्रकरणी तत्कालीन तहसीलदारांनी संबंधित क्रेशरवर ३ कोटी ८४ लाख ४६ हजार चारशे रुपयांचा दंड आकाराला होता याची माहीती अपीलकर्ता किशन सखाराम आढे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीची मागणी केली होती. मात्र संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत माहिती न दिल्याने तसेच समाधानकारक खुलासा न केल्याने हे प्रकरण राज्य माहिती आयोगापर्यंत गेले.या प्रकरणाची सुनावणी करून आयोगाने स्पष्ट



केले की, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(१) अंतर्गत आवश्यक माहिती देण्यात संबंधित अधिकारी अपयशी ठरले असून ही बाब गंभीर आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व नायब तहसीलदार यांच्यावर रु. ५,००० (अक्षरी पाच हजार रुपये) इतका दंड आकारण्यात येत असल्याचा आदेश देण्यात आला आहे.

हा दंड संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करून शासनाच्या लेखाशीर्षाखाली जमा करण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत. तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांना या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासनाला इशारा

माहिती आयोगाच्या या आदेशामुळे तालुकास्तरावरील कार्यालयांमध्ये माहिती अधिकाराबाबत होणाऱ्या दुर्लक्षावर कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. माहिती देण्यास टाळाटाळ केल्यास कारवाई अटळ असल्याचा संदेश या आदेशातून देण्यात आला आहे.

## गटविकास अधिकाऱ्यांच्या संपामुळे कामकाज झाले ठप्पच..

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** रोजगार हमी योजनेच्या कामातून लाखो रुपयांचा अपहार केल्याचे उघडकीस आल्यामुळे शासकीय पैशाची चोरी करणाऱ्या संबंधित जबाबदार गटविकास अधिकाऱ्यावर कारवाई करून अटक करण्यात आल्याचा प्रकार धुळे जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीत घडला आहे. याप्रकरणी संबंधित गटविकास अधिकाऱ्याच्या समर्थनात राज्यातील सर्व गटविकास अधिकारी संपावर गेले आहेत. त्यामुळे पंचायत समिती अंतर्गत असलेली सोनपेठ तालुक्यातील नागरिकांची सर्व कामे खोळंबली आहेत. परिणामी तालुक्यातील नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

आर्वी पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेतून लाखो रुपयांचा अपहार केल्याचे दर्शनास आल्यामुळे संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सुनिता मरस्कोल्हे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या गटविकास अधिकाऱ्याला वाचविण्यासाठी व शासनावर दबाव आणण्यासाठी पंचायत समिती अंतर्गत असलेले कर्मचारी व गटविकास अधिकारी बेमुदत संपावर गेले आहेत. त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर झाल्यामुळे पंचायत समिती अंतर्गत येणारे शेतकऱ्यांसह विविध नागरिकांची कामे ठप्प झाली आहेत. परिणामी नागरिकांतून तीव्र नाराजीचा सूर ऐकण्यास मिळत आहे.

## पालम शहरात श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**पालम,/प्रतिनिधी-** शहरातील श्री संत मोतीराम महाराज नगरमध्ये श्री साईबाबा देवघर येथे श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ह. भ. प.नारायण महाराज पालमकर यांच्या सुश्राव्यवाणीतून श्रीमद् भागवत महापुराणाचे कथेचे निरूपण होणार आहे. दिनाक २४ डिसेंबर पासून ते ३० डिसेंबर पर्यंत दुपारी एक ते पाच या वेळेत भागवत महापुराण कथा चालणार आहे. ३० डिसेंबर मंगळवार रोजी दुपारी एक वाजता श्रीमद् भागवत महापुराण कथेची सांगता होईल व त्यानंतर महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. कथेचे यजमान गजानन नारलावार, बंडूकाका कळंबे पाटील बाजीराव चव्हाण असणार आहेत. पालम. शहर व परिसरातील सर्व भक्त मंडळींनी या भागवत महापुराण कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती आयोजक पदुदेवा जोशी पालमकर यांनी केली आहे.



## सेलू नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या विरोधात २९ डिसेंबरपासून बेमुदत उपोषण

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध आणि भ्रष्टाचारविरुद्ध सुजाण नागरिक अन्याय व भ्रष्टाचार विरोधी जनजागृती व निर्मुलन समितीने एल्गार पुकारला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांना बडतर्फ करावे, या मागणीसाठी दि. २९ डिसेंबर २०२५ पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास उघड यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

गंभीर आरोपांची सरबत्ती जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात मुख्याधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. निवेदनात नमूद केल्यानुसार, मुख्याधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यापासून नगर परिषदेच्या अनेक मोक्याच्या जागांचे भाडेपट्टा, लीज किंवा नोंदणी करताना आर्थिक व्यवहार करून त्या खाजगी व्यक्तींच्या घशात घातल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने विद्यानगर येथील बालवाडीची जागा, पोलीस चौकीची जागा, हसमुख कॉलनीतील हनुमान मंदिराची जागा आणि नगर परिषदेच्या टाऊन हॉल शेजारील जागांचा समावेश असल्याचे म्हटले आहे. वसुलीत अफरातफर केल्याचा दावा निवडणूक काळातील ना-हरकत प्रमाणपत्रे (बेबाकी प्रमाणपत्र) आणि डिजिटल बोर्ड लावण्यासाठी केलेल्या वसुलीमध्ये मोठ्या प्रमाणावर अफरातफर झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील इतर नगर परिषदांच्या तुलनेत सेलूत सर्वाधिक (सुमारे ८ ते १० लाख रुपये) वसुली करूनही त्याचा योग्य हिशोब नसल्याचे निवेदनात नमूद आहे. मागील कारकिर्दीवरही प्रश्नचिन्ह

मुख्याधिकाऱ्यांची यापूर्वीची सोनपेठ, पाथरी आणि गंगाखेड येथील कारकीर्द देखील वादग्रस्त राहिली असून, त्यांच्यावर निलंबनाची कारवाईही झाली होती, असा दावा समितीने केला आहे. सेलूत पदभार घेतल्यावर त्यांनी खाजगी माणसांच्या मदतीने कार्यालयातील रेकॉर्ड रूममध्ये फेरफार केल्याचा खळबळजनक आरोपही या पत्रात आहे. या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा २९ डिसेंबरपासून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा श्रीनिवास उघडे यांनी दिला आहे. विध्या नगर या भागातिल बालवाडी या परीसरातील बाळ गोपाळ यांना विध्येच धडे पाटी पूस्तकावर घेण्या करीता त्या वेळेसचे तात्कालिन नगर अध्यक्ष यांनी ५० वर्षा पूर्वी हा निर्णय घेत बालवाडी पायभरणी केली. पण मागील काळी काळात हि जागा हडपण्याच्य् उद्दशाने या शाळेची ईमारत पडली गेली पण या परीसरातील नागरीकांकडून हा प्रकार होवू देनार नसल्याची चेर्चो होत आहे. या करीता या परीसरातील नागरीक रसत्यावर उतरतील अशी भावना व्यक्त होत आहे.

## लाभार्थींनी तात्काळ कागदपत्रे सादर करावीत- वाघमारे यांचे आवाहन

**पालम,/प्रतिनिधी:** तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सुरू ठेवण्यासाठी युनिक डिसॅबिलिटी आयडी (युडिआयडी) कार्ड सादर करणे आवश्यक आहे. युडिआयडी कार्ड नसलेल्या लाभार्थ्यांचे शासकीय योजनांचे लाभ बंद करण्यात येणार असल्याची माहिती तहसील प्रशासनाने दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या शासन निर्णयानुसार ही अट लागू करण्यात आली आहे. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना यांसह अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना युडिआयडी कार्ड सादर करणे बंधनकारक आहे.

तसेच संबंधित लाभार्थ्यांचे बँक खाते व योजना आधार क्रमांकाशी संलग्न (लिंक) असणे आवश्यक असल्याचे तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शासन (पान क्र. २ वर) निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनांतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा मासिक अर्थसहाय्य दिले जाते. मात्र, अद्याप अनेक लाभार्थ्यांनी युडिआयडी कार्ड, अद्ययावत दिव्यांग प्रमाणपत्र व आधार कार्ड सादर केलेले नाही.अशा लाभार्थ्यांनी वेळेत आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास त्यांचे मासिक अनुदान तसेच इतर शासकीय लाभ बंद करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा तहसील प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



मूळ कागदपत्रांसह तहसील कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन या संदर्भात पालम तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी युडिआयडी कार्ड,मूळ दिव्यांग प्रमाणपत्र व आधार कार्ड या कागदपत्रांसह पालम तहसील कार्यालयातील संबंधित विभागाशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार वाघमारे यांनी केले आहे. वेळेत कागदपत्रे सादर न केल्यास मिळणारा शासकीय लाभ थांबविण्यात येईल,याची नोंद लाभार्थ्यांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## दौंड-काष्टी दरम्यान लाईन ब्लॉक; काही रेल्वेगाड्या रद्द

**परभणी,/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या पुणे विभागात दौंड-काष्टी दरम्यान दुहेरीकरण चे कार्य करण्यासाठी लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामामुळे काही रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली. प्रवाशांनी या बदलांची नोंद घ्यावी व प्रवासाचे नियोजन त्यानुसार करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## आदिवासी मंत्री हिकेच्या निषेधार्थ आदिवासी कोळी महादेव बांधवांचा मोर्चा.....

संपत तेली

**पूर्णा,/प्रतिनिधी-** राज्याच्या अनुसूचित जमातीत समाविष्ट असलेल्या कोळी महादेव, कोळी मल्हार, टोकरे कोळी जमातीचा मोर्चा नागपूर येथे ४ दिवस चाललेल्या आमरण उपोषणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून दुजाभाव केल्याबाबत आणि प्रश्नांची सोडवणूक न केल्याबद्दल आदिवासी मंत्री डॉ अशोक उईके यांचा जाहीर निषेधार्थ पूर्णा तहसीलदार यांच्याकडे १८ गुरुवार रोजी महादेव कोळी बांधवांनी निवेदन सादर केले.

क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित राज्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, डोंगर कोळी, ढोर कोळी संघर्ष समितीचे आयोजक दत्ताभाऊ सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली १० डिसेंबर २०२५ रोजी यशवंत स्टेडियम नागपूर येथे हजारो बांधवांचा विधानभवनावर मोर्चा नेला असता सदरील मोर्चाचे निवेदन मोर्चासमोर येऊन आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके यांनी स्वीकारले नाही. मोर्चेकरी मोर्चा स्थानावर रात्री दहा वाजेपर्यंत थांबले असताना



प्रशासनाचे प्रतिनिधी कोणीही त्या ठिकाणी चर्चेसाठी आले नाही. त्यानंतर त्याच रात्री यशवंत स्टेडियम येथे अनुसूचित जमातीच्या काही बांधवांनी आमरण उपोषण सुरु केले होते. सलग चार दिवस आमरण उपोषण शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थित सुरू होते. तरीपण आदिवासी मंत्री यांनी शिष्टमंडळास स्वतः होऊन बैठकीसाठी अधिकृत वेळ दिला नाही, आणि सविस्तर चर्चाही केली नाही, पोलिसांच्या दबावामुळे, केवळ फोटो काढण्यापुरते निवेदन स्वीकारले.. मला वेळ नाही म्हणून आम्हा आदिवासी बांधवांची कुचंबना केली. त्यानंतरही उपोषण सुरू राहिले असताना, आपल्या विभागाची बदनामी नको म्हणून पोलीस प्रशासनावर दबाव टाकून आंदोलकांची धरपकड केली. अनेकांना जनावरांसारखे फरपटत नेले. आदिवासी खात्याशी प्रश्न निगडित असताना स्वतः खात्याचे मंत्री असल्याने प्रश्न सोडवण्याची जबाबदारी असताना जाणीवपूर्वक दुजाभाव केला. विशेष म्हणजे त्याच वेळेस त्याच दिवशी आदिवासी विकास परिषदेच्या शिष्टमंडळास तात्काळ चर्चेसाठी बोलावले जो मोर्चा १२ तारखेला होता तो मोर्चा स्थगित करून त्यांची मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक लावण्याची शिफारस स्वतः आदिवासी मंत्री यांनी करून बैठक लावली. आमचाही मोर्चा त्यांच्या खात्याशी निगडित असताना देखील आमच्या शिष्टमंडळासोबत चर्चा न करता प्रश्न समजुन न घेता मला वेळ नाही म्हणून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, आणि दुजाभाव केला आणि पोलिस प्रशासनावर दबाव आणून सनदशीर मार्गाने सुरु असलेले आमचे आमरण उपोषण पोलिसांनी बळाचा वापर करून मोडीत काढले. आमचे न्याय्य हक्क आणि आमचा प्रश्न समजुन घेतला नाही, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्नही केला नाही त्यामुळे आमच्या भावना प्रचंड दुखावल्या आणि यापुढील काळात लवकरच बैठक नाही घेतल्यास परत २३ फेब्रुवारी २०२६ पासून पुन्हा आझाद मैदानावर तीव्र आमरण उपोषण आंदोलन करण्यात येईल याचाही इशारा या निवेदनकर्त्यांनी दिले आहे निवेदनावर रमेश पिठ्ठलवाड, भगवान सोळंके,किशोर सूर्यवंशी,सतीश सुरवसे, मारोती जगता ,शिवराम भंगे,गोविंद सोलेवाड ,संपतराव तेली,काशिनाथ दारकोडे,भुजंगराव सुरवसे, ॲड.सुधाकर चुनोडे ,रेणुका घोरपडे, देवका पानोडे, पूजा घोरपडे, सुनिता भिसे, ज्योती शेळके, मयुरी भंगे, अन्नपूर्णा भंगे, पुष्पा सूर्यवंशी, सारजा दारकोंडे, गंगाबाई सोळंके,रत्ना भिसे, रेखा घोरपडे, द्वारका भिसे, पदमीन भिसे, पारू घोरपडे, लक्ष्मी सोळंके, विजयमाला भिसे, भाग्यश्री भिसे, अरुणा भिसे, गंगासागर भिसे, प्रयाग भिसे, राज्यश्री भिसे, निर्मला मामडे, उषा घोरपडे, आदींच्या स्वाक्षऱ्याचे निवेदन देण्यात आले.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर ची एकदिवसीय सहल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

दि .१७/१२/२०२५ वार बुधवार रोजी सकाळी ठीक ६ :०० वाजता सहलीसाठी शाळेतून निघालो .सर्व प्रथम पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव चौंडी या ठिकाणी गेलो .येथे १२राशी आणि ३५नक्षत्राची माहिती असलेल्या वेगवेगळ्या सुंदर चित्र होते विद्यार्थांनी ते पहिले .त्यानंतर वाड्यांमध्ये सर्व काही पहिले ..जुना वाडा मुले खूप कौतुकाने पाहत होते .सर्व पाहिल्यानंतर तेथे नाश्ता देण्यात आला .हा नाश्ता सर्वांनी एकत्र घेतला .मग गाडी निघाली करमाळा येथे असलेल्या कमलाई देवीच्या दर्शनाला हे मंदिर जाग्रुत आणि ऐतेहासिक मंदिर आहे याची माहिती सुनंदा ताईंनी सांगितली हे मंदिर निंबाळकर घराण्याने बांधले आहे .हेमाडपंती शैलीतील दगडी बांधकाम अशी या मंदिराची ओळख आहे .देवीचे दर्शन झाल्यानंतर निघालो निरा नरसिंह पूर .येथे निरा आणि भीमा नद्यांचा संगम लक्ष्मी नरसिंह मंदिर आहे .येथील नृसिंहाची मूर्ती वाळूची बनलेली आहे .संत नामदेव आणि संत तुकाराम महाराजांनी या स्थळी भेट दिली होती .



येथे दर्शन झाल्यानंतर सर्वांनी मिळून सहभोजन केले .मुलांनी खरेदी केली .सर्व ठिकाणी विद्यार्थांनी खूप मज्जा केली .यानंतर गाडी बीडच्या दिशेने निघाली .विद्यार्थांनी गाडीमध्ये गाण्यावर न्रुत्य करून सहलीचा मनमुराद आनंद लुटला .अशा प्रकारे ही सहल मजेत आणि उत्साहात पार पडली .या सहलीच्या प्रमुख अर्चना ताई मोराळे होत्या .डॉ .सीमा ताई जोशी ,गंगाधरजी देशमुख सर ,सुनंदा ताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले .तसेच जाडकर सर यांचे सहकार्य लाभले .ही सहल यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

# मांजरसुंबा येथील ऊसतोड मजुराच्या मुलाची भारतीय सैन्य दलात भरारी

**तभा वृत्तसेवा**
**मांजरसुंबा दि.२० डिसेंबर**



बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील ऊसतोड मजूर अभिमान गायकवाड यांचा मुलगा दर्शन अभिमान गायकवाड याने भारतीय सैन्य दलाच्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी कामगिरी करत देशसेवेची सुवर्णसंधी मिळवली आहे. मांजरसुंबा या ग्रामीण भागातून भारतीय सैन्यात निवड होणारा तो पहिलाच युवक ठरल्याने संपूर्ण गावात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून दर्शनने हे यश संपादन केले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी त्याचे आई-वडील दरवर्षी बाहेर राज्यात ऊसतोड मजुरीसाठी स्थलांतर करतात. अशा प्रतिकूल परिस्थितीतही दर्शनने शिक्षणात सातत्य ठेवत सैन्य भरतीसाठी कठोर परिश्रम घेतले. पहाटे लवकर उठून सराव, धावणे, व्यायाम आणि लेखी परीक्षेची तयारी त्याने जिद्दीने सुरू ठेवली.

# ना.पंकजा मुंडे यांची नांदेड महापालिका निवडणुकीच्या प्रभारीपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची नांदेड महापालिका निवडणुकीच्या प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज एका पत्राद्वारे ही नियुक्ती केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ नांदेड महानगरपालिका निवडणुकीकरिता आपली नियुक्ती करण्यात आल्याचे आज घोषित करण्यात आले.

आपण आपल्या संघटन कौशल्याने भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याकरिता सर्वांना सोबत घेऊन अथक परिश्रम कराल, असा मला पूर्ण विश्वास आहे असं पत्रात नमूद करून प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.२० डिसेंबर**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात किर्तनाच्या प्रभावी माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य करणारे,स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर तर,प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुनील कुंभार सर उपस्थित होते.मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक श्री सुनील कुंभार सर यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.अध्यक्षीय समारोपपर भाषणात मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर यांनी संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता व सेवेविषयी समाजजागृती केली. आपणही त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपले घर,आपला वर्ग, शाळा, शालेय परिसर नेहमी स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करुयात, असे आवाहन केले व सर्वांना संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त शुभेच्छा दिल्या.सुत्रसंचलन श्री.अनिल चव्हाण सर यांनी केले.कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने झाली.

# रोटरी क्लबच्या वतीने मतदारांसाठी सेल्फी पॉईंट व वृक्षांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२० डिसेंबर**

नगर परिषदेच्या मतदानासाठी मतदारांमध्ये जनजागृती व मतदारांचा उत्साह वाढवण्यासाठी श्री.खोलेश्वर विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षांचे वाटप व सेल्फी पॉईंट ठेवण्यात आला होता.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार जनजागृती ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे, या प्रेरणादायी उपक्रमाचे उद्घाटन, खोलेश्वर माध्यमिक शाळा, मतदान केंद्र परिसर, झाले या प्रसंगी उद्घाटक म्हणून सौ. जया अविनाश मुडेगावकर यांची उपस्थिती होती.यावेळी मतदारांनी मतदान केल्यानंतर मतदारांनी अभिमानाने शाईचा ठसा दाखवत, तुळशीचे रोप घरी घेऊन गेले आणि सेल्फीसह लोकशाहीचा उत्सव साजरा केला. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, कल्याण काळे, राजेंद्र घोडके, धनराज काळे,स्वरुपा कुलकर्णी यांच्यासह रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.



# वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर एक्सिस हॉस्पिटलचे विशेष तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार, २२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत.

या विशेष उपक्रमाचा उद्देश पोटविकारांचे लवकर निदान,पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी आणि संडासमध्ये रक्त पडणे कावीळ असल्यास, लिव्हर सिरोसीस किंवा लिव्हर संबंधी इतर कुठलाही आजार असल्यास ,हिपेटाईटीस बी किंवा हिपेटाईटीस सी चे संक्रमण झाले असल्यास, पित्ताशय किंवा पित्ताशयाच्या नलिकेमध्ये खडे असल्यास, गिळन्यास त्रास होत असल्यास तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत नागरिकांना प्रभावी मार्गदर्शन करणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून यात तज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

या संदर्भात, सैय्यद हसीब सर यांनी एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल(माने पेट्रोल पंपाच्या मागे, नर्सरी रोड, बीड) तर्फे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि या संधीचा अवश्य लाभ घ्या.अधिक माहितीसाठी व पूर्वनोंदणीसाठी ९९२३०१०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# पुणे, धाराशिव ,मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, सांगली संघ उपान्त्यफेरीत दाखल

**चुरस वाढली ; प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

येथील श्रीमतीयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलावर सुरू असलेल्या ६१ व्या महिला - पुरुष अजिंक्यपद व चाचणी खो खो स्पर्धेत स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात उपउपान्त्य फेरीच्या सामन्यात ठाणे, पुणे, धाराशिव, सातारा , सोलापूर सांगली ,नाशिक संघाची उपान्त्य फेरीसाठी विजयाची घौडदौड सुरू आहे . सायंकाळच्या सत्रात ६ वाजता उपांत्य फेरीचे सामने सुरू होतील . यात पुरुष व महिला यांचे ४ - ४ संघ झुंज देतील आणि महाराष्ट्र संघाची निवड होईल.

गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या या क्रीडा स्पर्धेत २० डिसेंबर सकाळच्या सत्रामध्ये झालेली सामने असे - महिला गटात ठाणे विरुद्ध सांगलीत ठाणे संघ ८ गुणांनी विजयी झाला . सामन्यात कंक धनश्री २ . ४५ , नरसाळे गीतांजली २ . २० मि, राठोड रेशमा १ . ४९ आणि दुसऱ्या डावात १ . १० मि, सोनसुळकर प्रतिक्षा ४ गुण तर चोरमारे श्रुतीने ४ गुण प्राप्त करून आपल्या संघाला यश मिळवून दिले . सांगली संघातून सानिका चाफे हिने २ . २० मि . तर बिराजदार प्रतीक्षा ८ गुण घेऊन आणि चाफे वैष्णवी ४ गुण घेऊन बहारदार खेळ केला . दुसऱ्या सामन्यात पुणे विरुद्ध अहिल्यानगर यांच्यात सामना झाला . पुणे संघ ४१ गुणांनी विजयी झाला . दीपाली राठोड ४ मि , वाघ श्वेता ३ मि ,बडे भाग्यश्री २ . ५० मि, इंगळे प्रियंका व राठोड दिपालीने प्रत्येकी १० गुण घेऊन पुणे संघाला ४१ गुणांनी विजयी केले . धाराशिव आणि मुंबई उपनगर या महिला गटाच्या सामन्यात धाराशिव संघ २३ गुणांनी विजयी झाला . धाराशिव संघात सुरवसे संध्या हिन ४.१० मि ,पवार मैथिली ३ मि ,भोसले तन्वी हिने २ .५०मि संरक्षण केले तर धोत्रे सुहानी यांनी ८ गुण, काळे प्रणालीने ६ गुण घेतले . पराभूत झालेल्या मुंबई उपनगर संघात वाफेलकर साक्षीने १ . २० मि आणि दुसऱ्या डावात १ . ४० मि संरक्षण करीत २ गुण घेतले . अहिरे देवीका हिने १ . ३० मि आणि दुसऱ्या डावात ३० सेकंद संरक्षण केले .पुरुष गटात सकाळच्या सत्रामध्ये अहिल्यानगर आणि सातारा यांच्या पहिला सामना झाला यामध्ये सातारा संघ अवघ्या दोन गुणांनी विजयी झाला . नगर संघाकडून खैरे सार्थक १ २५ मि आणि दुसऱ्या डावात १ मि खेळ केला . पवार सोहेल १ . ४० तर दुसऱ्या डावात १ . १० मि ., ढाकणे किरण ४ गुण तर कातकडे नरेंद्र १० गुण प्राप्त केले . सकाळच्या सत्रातील शेवटचा सामना सोलापूर विरुद्ध सांगली असा झाला . नियोजित वेळेत सामना समसमान गुणामुळे बरोबरीत सुटला . अतिरिक्त वेळेत हा सामना सांगली संघाने जिंकला . स्पर्धेसाठी राज्य खो खो संघटनेचे कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, उपाध्यक्षा अश्विनी पाटील, राज्य सचिव डॉ. चंद्रजित जाधव , कार्यालयीन सचिव प्रशांत इनामदार जातीने उपस्थित आहेत . राज्य तांत्रिक समितीचे सचिव डॉ. नरेंद्र कुंदर, सहसचिव आशिष पाटील, महेंद्रकुमार गाढवे सामन्यांवर कडक नजर ठेवून काम पहात आहेत . महाराष्ट्राचा पुरुष व महिलांचा संघ निवडण्यासाठी निवड समितीत सुरेंद्र विश्वकर्मा, मुंबई, राम चौपट परभणी, कृष्णा करंजकर रत्नागिरी, प्रियंका चव्हाण ठाणे यांचा समावेश आहे .या स्पर्धेसाठी पंच मंडळ अध्यक्ष सुधाकर राऊळ, सचिव प्रशांतकाका पाटणकर , सामनाधिकारी - प्रभाकर काळे, किशोर पाटील, संतोष सावंत, नानासाहेब झांबरे, संदेश अंबेर, रफिक शेख ,राहूल माशाळकर, रामप्रसाद धर्मे, जतीन टेकाळे, सुशील दहिंबेकर, अंकुश चव्हाण, पांडुरंग पेडणेकर, निलेश गायकवाड, लखन कांबळे, सोमनाथ स्वामी, निखील पाटील, नितीन पानवलकर, मोनिक भापकर, सुनिल माळी, हरीष पाटील ,समर्थ कोळी, संभाजी यशवंते, स्वानंद आंग्रे, उमेश खटींग ,तुकाराम माळी, चिरंजीवी कट्टा, अमोल मुटकुळे, गौरव सपकाळ, नागेश हेळकर, दीपक सपकाळ यांनी काम पाहिले . स्पर्धा यशस्वीतेसाठी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मार्गदर्शक प्रा. जनार्दन शेळके यांनी व्यक्त केला. प्रा. जे. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे,सचिव - विजय जाहेर , राज्य प्रसिद्धी समिती सदस्य संदीप तावडे ,बाळ तोरस्कर ,प्रा . राजेंद्र बरकसे, अविशांत कुमकर यांच्यासह विभागीय सचिव वर्षा कच्छवा, डॉ . रवि खरात,योगेश सोळसे, मनोज जोगदंड, कैलास गवते, अनिल शेळके, माधव जायगुडे, बंडू घोरड अमोल सांगुळे, प्रफुल्ल हाटवटे , नितीन फुटवाड, सुनिता जायभाये रमेश पिसाळ, सुधीर हजारे, नितीन येळवे, अंकुश गायकवाड, संदिप हांगे , बापूसाहेब तारुकर , राऊत, भरत यादव, मुंजाराम निरडे, सोमनाथ मंडलिक, छत्रभूज ढेंबरे , भागवत ठोकरे, विकास ठोंबरे , राम येवले , मुकुंद रसाळ आदी कार्यकर्ते ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत.

# आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये 'आनंदनगरी' फन फेअर उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२० डिसेंबर**

येथील आयुष ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये दिनांक २० डिसेंबर रोजी 'आनंदनगरी - खाद्यपदार्थांची मेजवानी' या नावाने भव्य फन फेअरचे आयोजन करण्यात आले. उपक्रमाला विद्यार्थी, पालक व शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

फन फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध घरगुती व चविष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. मटकी, चणा मसाला, पावभाजी, वडापाव, समोसा, पाणीपुरी, भेळ, शेवपुरी, दहीपुरी, इडली-सांबार, ढोकळा, जिलेबी, गाजर हलवा, गुलाब जामून, भाकरी पिझ्झा, पोहे, हुरडा भेळ, पॉपकॉर्न, मोमोज, नूडल्स, व्हेज बिर्याणी, अप्पे, धपाटे-दही तसेच विविध थंड पेयांचा आस्वाद घेण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती.विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने स्टॉल्स सांभाळत विक्री केली. यामध्ये अधिक कमाई करून 'आनंदनगरी' फन फेअरचे अनुश थळकर, ऋत्वी बजाज, माही इंगळे, राघव बादाडे व अभिर गडम हे विद्यार्थी विजेते ठरले.

याउपक्रमाचे आयोजन शाळेचे संचालक शसागर राजेंद्र करवा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याध्यापिका सौ. भाग्यश्री सागर करवा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय कौशल्य, आर्थिक व्यवहाराचे ज्ञान, संघभावना, नेतृत्वगुण व आत्मविश्वास विकसित करण्याची संधी मिळाली.फन फेअरमुळे संपूर्ण शाळा परिसर आनंदी, उत्साही व रंगतदार वातावरणाने भारावून गेला होता. पालकांनीही या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मनापासून दाद दिली.या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा प्रशासनाने सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# २१ डिसेंबर - हिवाळी अयनांत : सर्वात मोठी रात्र आणि सर्वात लहान दिवस



अंधारातून उजेडाकडे जाणाऱ्या निसर्गयात्रेचा शाश्वत संदेश

निसर्ग कधी बोलत नाही , पण तो सतत शिकवत असतो. दिवस आणि रात्र , ऊन आणि सावली , थंडी आणि उष्णता , बीज आणि अंकुर , पीक आणि धान्य - या साऱ्या प्रवाहामागे एक अचूक आणि शाश्वत नियम कार्यरत असतो. २१ डिसेंबर हा दिवस त्या नियमाचा जिवंत अनुभव देणारा दिवस आहे. या दिवशी उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात मोठी रात्र आणि सर्वात लहान दिवस अनुभवास येतो. या खगोलीय घटनेला हिवाळी अयनांत असे म्हटले जाते. हा दिवस केवळ आकाशातील गणितापुरता मर्यादित नसून तो निसर्ग , शेती , संस्कृती , तत्त्वज्ञान आणि माणसाच्या जीवनप्रवासाशी अतिशय घट्ट जोडलेला आहे.

पृथ्वीचा अक्ष सरळ नसून तो सुमारे तेवीस अंश झुकलेला आहे. याच झुकावामुळे पृथ्वी सूर्याभोवती फिरताना ऋतू निर्माण होतात. हिवाळी अयनांताच्या दिवशी सूर्याचे थेट किरण मकरवृत्तावर पडतात. परिणामी उत्तर गोलार्ध सूर्यापासून अधिक झुकलेले असते. सूर्यकिरण तिरपे पडतात , उष्णतेचा पुरवठा कमी होतो , दिवस लहान होतो आणि रात्र मोठी होते. या दिवशी सूर्याची आकाशातील उंची वर्षातील सर्वात कमी असते. सावल्यांची लांबी सर्वाधिक असते. मात्र याच क्षणापासून सूर्याचा उत्तर दिशेने प्रवास सुरू होतो आणि दिवस हळूहळू वाढू लागतात. म्हणूनच हिवाळी अयनांत म्हणजे अंधाराचा कळस आणि उजेडाची सुरुवात.

ग्रामीण जीवनात हिवाळी अयनांताचा अनुभव शास्त्रापेक्षा अधिक संवेदनशील पातळीवर जाणवतो. पहाटे दवबिंदूंनी झाकलेली पिके , धुक्यात हरवलेल्या शेतवाटा , गुरांच्या श्वासातून निघणारी वाफ , थंडीने कुडकुडणारी माणसं - या साऱ्या दृश्यांतून निसर्गाची शांत भाषा ऐकू येते. शेतकरी सहज म्हणतो , आता सूर्य वळायला लागला. या एका वाक्यात पुढील हंगामाची आशा दडलेली असते. रब्बी पिके वाढीच्या टप्प्यात असतात. गहू , हरभरा , ज्वारी , मसूर यांसारखी पिके थंडीला चांगला प्रतिसाद देतात. हिवाळी अयनांत म्हणजे शेतीच्या दृष्टीने स्थैर्याचा , विश्वासाचा आणि पुढील नियोजनाचा काळ.

भारतीय संस्कृतीत सूर्याला केवळ आकाशातील तारा म्हणून पाहिले गेले नाही , तर जीवनदाता मानले गेले. सूर्याच्या हालचालींवर आधारित पंचांग , ऋतूचक्र आणि शेतीव्यवस्था उभी राहिली. सूर्याचा दक्षिणायन आणि उत्तरायण प्रवास हा काळाच्या मोजमापाचा आधार ठरला. हिवाळी अयनांतानंतर सूर्याचा उत्तरायण प्रवास सुरू होतो. म्हणूनच अनेक ठिकाणी हा काळ शुभ मानला जातो. अंधार कमी होऊन प्रकाश वाढतो , ही कल्पना केवळ भौतिक नाही , तर मानसिक आणि आध्यात्मिकही आहे. ग्रामीण भाषेत काही ठिकाणी याला हिवाळी संक्रांत असेही संबोधले जाते , परंतु खगोलशास्त्रीयदृष्ट्या हा दिवस हिवाळी अयनांत म्हणूनच ओळखला जातो.

जगभरातील विविध संस्कृतींमध्ये या दिवसाला वेगवेगळ्या पद्धतीने महत्त्व दिले जाते. कुठे सूर्यपूजन केले जाते , कुठे दिवे लावून अंधार दूर करण्याची परंपरा आहे , तर कुठे निसर्गाशी एकरूप होण्याचे विधी केले जातात. या सर्व परंपरांच्या मुळाशी एकच भावना आहे - अंधारानंतर प्रकाशाचा विजय अटळ आहे. ही भावना मानवी जीवनालाही लागू पडते.

हिवाळी अयनांत माणसाला संयम शिकवतो. जीवनात असे टप्पे येतात जेव्हा अंधार वाढलेला वाटतो , मार्ग अस्पष्ट होतो , आशा क्षीण होते. पण निसर्ग सांगतो की अंधार हा शेवट नसतो. तो बदलाचा टप्पा असतो. जिथे रात्र सर्वात मोठी असते , तिथूनच दिवस वाढायला लागतो. म्हणूनच हा दिवस आशेचा , धैर्याचा आणि सातत्याचा आहे.

ग्रामीण समाजात आजही ज्येष्ठ लोक ऋतूंच्या हालचाली अचूक ओळखतात. सूर्याची दिशा , थंडीची तीव्रता , धुक्याचे प्रमाण , पिकांची अवस्था - या निरीक्षणांवरून ते पुढील काळाचा अंदाज घेतात. आधुनिक विज्ञानाने या गोष्टी मोजमापात मांडल्या , पण अनुभव तर गावकऱ्यांनी पिढ्यानपिढ्या जपला आहे.

हिवाळी अयनांतानंतर दिवस संथपणे वाढू लागतात. ही वाढ हळू असते , पण निश्चित असते. त्यामुळे हा दिवस घाई न करता सातत्यावर विश्वास ठेवायला शिकवतो. बदल एका रात्रीत होत नाही , पण योग्य दिशेने सुरू झालेला प्रवास थांबत नाही.

निसर्ग जणू माणसाला सांगतो -

रात्र मोठी झाली म्हणून घाबरू नको.

उजेड मागे नाही , तो वाटेत आहे.

थांब जरा , पाहा नीट.

सूर्य पुन्हा वर येणार आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात हिवाळी अयनांत आपल्याला थांबायला सांगतो. आकाशाकडे पाहायला , ऋतू जाणवायला , स्वतःच्या आत डोकावायला शिकवतो. अंधार आणि उजेड यांचे संतुलनच जीवन आहे , हे उमगायला लावतो.

म्हणून २१ डिसेंबर हा दिवस केवळ खगोलशास्त्राचा नाही. तो शेतीचा आहे , संस्कृतीचा आहे , तत्त्वज्ञानाचा आहे आणि माणूस म्हणून जगण्याचा आहे. अंधारातून उजेडाकडे नेणारी ही निसर्गयात्रा आपल्याला एकच शाश्वत संदेश देते - बदल अटळ आहे , आणि आशा अमर आहे.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# नर्सी नामदेव येथे काल्याचे किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

तालुक्यातील नरसी नामदेव येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह संगीत राम कथा व कीर्तन महोत्सव मागील आठवडाभरापासून सुरू होता. शनिवारी काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. यावेळी लाखो भाविक उपस्थित होते.



यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, मंदिर संस्थानचे पदाधिकारी तसेच सदस्य यांची उपस्थिती होती.

मागील आठवडाभरापासून संत नामदेव यांच्या जन्मभूमीमध्ये श्री राम कथा प्रवक्ते ह भ प समाधान महाराज शर्मा यांची रामकथा ऐकण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते. दि १३ डिसेंबर पासून ते १९ डिसेंबर पर्यंत राम कथा कार्यक्रम घेण्यात आला. १३ डिसेंबर रोजी ह भ प दादाराव महाराज दिग्रसकर यांचे कीर्तन सकाळी ९.३० ते ११.३० झाले. त्यानंतर संध्याकाळी ६ ते ८पर्यंत यांचे किर्तन झाले. तर १४ डिसेंबर रोजी ह भ प शिवमुर्ती तेलंगणा आंध्र यांचे किर्तन झाले.तर तर संध्याकाळी ह भ प पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा यांचे कीर्तन झाले.

१५ डिसेंबर सोमवारी ह भ प श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे किर्तन सकाळी साडेनऊ ते साडेअकरा झाले. संध्याकाळी सहा ते आठ ह भ प सोपान महाराज शास्त्री वेल तुरा यांचे कीर्तन झाले.

१६ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा ह भ प नामदेव महाराज लबडे यांचे किर्तन, संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे किर्तन झाले.

१७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा ह भ प श्री अनिल पाटील बार्शीकर यांची किर्तन र्तन झाले. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प जगन्नाथ महाराज पाटील मुंबई यांचे किर्तन झाले १८ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा यावेळी ह भ प उमेश महाराज दशरथे यांचे कीर्तन झाले. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे किर्तन झाले. १९ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते अकरा या वेळेत ह भ प संजय महाराज पाचपोर यांचे किर्तन झाले. तर संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत ह भ प ज्ञानेश्वर माऊली कदम यांची किर्तन झाले.

२० डिसेंबर रोजी सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन ह भ प संजय नाना घोंडगे मकरंद वाडी यांनी केले.

कै. सखाराम महिपती मुटकुळे आणि कै. यमुनाबाई सखारामजी मुटकुळे यांच्या स्मरणार्थ महाप्रसादाचे आयोजन आमदार तानाजी सखारामजी मुटकुळे यांच्यावतीने करण्यात आले होते. काल्याचे किर्तन झाल्यानंतर लाखो महिला व पुरुष भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री संत नामदेव महाराज मंदिर जिर्णोद्धार समिती, व पंचक्रोशीतील मंडळी व भाविक भक्त गण आणि परिसर या महाप्रसादाचे आयोजन आमदार तानाजी मुटकुळे यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी हजारो स्वयंसेवक महिलांनी महाप्रसाद वाटपाचे कार्य केले. कार्यक्रमांनंतर ज्ञानेश्वर महाराज सरकटे यांना यावर्षीचा संत नामदेव पुरस्कार प्रदान करण्यात आला रोख रक्कम एक लाख रुपये सन्मानचिन्ह व संत नामदेव महाराजांची मूर्ती देण्यात आली. कै. सखाराम महिपती मुटकुळे आणि कै. यमुनाबाई सखाराम मुटकुळे यांच्या स्मरणार्थ आमदार तानाजी मुटकुळे यांच्या हस्ते देण्यात आला.

## प्रभारींच्या पायगुणाने काँग्रेसची वाताहत- गोरे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**



काँग्रेसचे प्रभारी सचिन नाईक व साहेबराव कांबळे यांनी आमच्या नेत्या प्रज्ञाताई सातव यांच्यावर केलेल्या टिकेला विलास गोरे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले असून प्रभारींच्या पायगुणामुळेच जिल्ह्यात काँग्रेसची वाट लागल्याचा पलटवार केला आहे. दोघांनीही येत्या काळात काँग्रेस कशी वाढेल याचे आत्मपरिक्षण करावे, आमच्या नेत्यांबद्दल सल्ला देऊ नये अन्यथा जशास तसेच उत्तर देऊ असा इशारा डॉ. प्रज्ञाताई सातव यांचे खंदेसमर्थक विलास गोरे यांनी दिला आहे.

गोरे पुढे बोलताना म्हणाले की, साहेबराव कांबळे यांनी हिंगोलीत लुडबूड न करता उमरखेडकडे लक्ष द्यावे, अगोदरच तिथे कांबळे यांच्या त्रासाला कंटाळून दोन माजी आमदारांसह अनेक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. त्यांनी हिंगोलीतील नेत्यांच्या पक्षप्रवेशऐवजी आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत पक्षसंघटन मजबूत करून काँग्रेसच्या उमेदवारांना निवडुन आणावे असे प्रतिआव्हान त्यांनी केले. सचिन नाईक यांच्यावर पक्षाच्या समन्वयाची जबाबदारी असताना त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत स्वतःसाठीच उमेदवारी मागत गटबाजीला प्रोत्साहन दिले. परिणामी, पक्षाची वाताहात झाल्याचा गंभीर आरोप गोरे यांनी केला. दुसऱ्यांकडे बोट दाखवताना आपल्या दिशेने चार बोटे असतात याचे भान देखील नाईक यांनी ठेवावे असा टोला देखील गोरे यांनी लगावला. आगामी काळात काँग्रेसकडून निवडणुक लढवून आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखविण्याचे आव्हान देखील केले. आम्ही आगामी सर्वच निवडणुकीत चार हात करण्यास तयार असल्याचे गोरे यांनी सांगितले.

## योग आणि ध्यानाने स्मरणशक्ती वाढते- डॉ संजय नाकाडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

आजच्या काळात मोबाईल, टि. व्ही. संगणक या सारख्या तंत्रज्ञानामुळे भटकणाऱ्या मनाला योग आणि ध्यान मदत करते. त्यामुळे मन एकाग्र करण्यासाठी, चांगल्या स्मरणशक्तीसाठी विद्यार्थी जीवनापासून योग व ध्यान करावे व जागतिक ध्यान दिनानिमित्त तसा संकल्प करावा असे प्रतिपादन हार्टफुलनेसचे अभ्यासी तथा डॉ. संजय नाकाडे यांनी केले.



शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे व सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. हार्टफुलनेस संस्थेतर्फे रविवारी २१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता हार्टफुलनेसचे जागतिक मार्गदर्शक कमलेश पटेल उर्फ दाजी यांच्या सोबत विशेष ऑनलाईन ध्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात शांती, करुणा आणि एकतेचा संदेश देण्यासाठी जगभरातील लाखो साधक एकत्र येणार आहेत. एक विश्व, एक हृदय या संकल्पनेतून अंतमुखता, मानसिक संतुलन आणि सामूहिक कल्याणाचा अनुभव घेण्याची ही अनोखी व विनामूल्य संधी आहे असे सांगून हार्टफुलनेसचे अभ्यासी तथा पतंजलीचे भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके यांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष ध्यान करून घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे सहशिक्षक एन.टी.सोळंके यांनी तर आभार प्रदर्शन सहशिक्षक टी. एस. खिल्लारे यांनी केले.



**हिंगोली- हिंगोली शहरातील प्रभाग क्रमांक ५ ब व प्रभाग क्रमांक ११ ब यांसाठी नगर पालिकेचे निवडणुकीसाठी शनिवारी मतदान झाले. यावेळी मतदान करण्यासाठी महिलांनी सकाळपासूनच मतदान केंद्रावर रांगा लावल्या होत्या. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### रविवारी नाईक नगरात भव्य आरोग्य शिबीर

हिंगोली-श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार असून मारुती मंदिरा जवळ, नाईक नगर, हिंगोली येथे होणार आहे. या शिबिरात मेडिसिन, न्यूरोलॉजी, ऑर्थोपेडिक्स, नेत्ररोग व रेटिना तपासणी यांसह विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरात सेवा देणारे डॉक्टरांमध्ये डॉ. यशवंत पवार (मेडिसिन), कन्सल्टंट फिजिशियन, डॉ. नितीन पायघन(युरोलॉजी), कन्सल्टंट युरोलॉजिस्ट, अँड्रोलॉजिस्ट व किडनी ट्रान्सप्लांट सर्जन, डॉ. अरुण काळे (ऑर्थोपेडिक), कन्सल्टंट ऑर्थोपेडिक सर्जन, डॉ. प्रतीक लखमावर- कन्सल्टंट रेटिना सर्जन. डॉ. नागेश पिंपरेचड (नेत्ररोग), कन्सल्टंट नेत्रतज्ज्ञ, शिबिरामध्ये भाग घेण्यासाठी डॉ गणेश अंभोरे, नागेश शिंदे, नितीन शिंदे यांच्याशी संपर्क साधावा. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी आणि शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. सर्व नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त असून, आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

### वसमत नगर परिषदेसाठी शांततेत मतदान संपन्न

हिंगोली- जिल्ह्यातील वसमत नगर परिषदेसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली असून लिटल स्कुल मतदान केंद्रावर प्रारूप मतदानावेळी मतदान यंत्रात बिघाड झाला होता. यावेळी उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदवला. उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी तत्काळ मतदान केंद्रावर भेट देत त्याठिकाणी नवीन मतदान यंत्र पुरवल्यानंतर मतदान प्रक्रीया पूर्ववत सुरू झाली होती. वसमत नगर परिषद निवडणुकीसाठी शनिवारी ७२ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सकाळी साडेसात ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत घेण्यात आली. यावेळी मतदारांनी सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ३३ हजार ६४८ इतक्या मतदानाची नोंद करण्यात आली होती. त्यामध्ये १६५०१ पुरूष मतदार तर १७१४७ स्त्रीयांनी मतदान केले. मतदानाची टक्केवारी ५६.२२ टक्के इतकी होती. अजूनही मतदान केंद्रावर मतदानासाठी रांगा दिसत आहेत. महिलांनी सकाळीच मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रांगा लावलेल्या दिसत होत्या. वृध्द, दिव्यांग तसेच तरूणांनी मतदान करण्यासाठी उत्साहात सहभाग घेतल्याचे दिसत होते. शहरातील संवेदनशील मतदान केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील संवेदनशील मतदान केंद्रांना भेटी देत पाहणी केली. यावेळी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ यांची उपस्थिती होती. वसमत नगर पालिकेत महाविकास आघाडीच्या सीमा अब्दुल हाफीज, राष्ट्रवादी शिवसेनेच्या सुनीता बाहेती तर भाजपच्या बोड्डेवार यांच्यामध्ये तिरंगी लढत होत असून दि २१ डिसेंबर रोजी मतमोजणीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

XA

## भारतीय जनता पक्षाच्यावतीने डॉ. प्रज्ञा सातव यांचा भव्य सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

काँग्रेसच्या विधान परिषद सदस्या डॉ प्रज्ञा सातव यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर त्या हिंगोली येथे आल्या असता भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे यांनी त्यांच्या निवासस्थानी डॉ प्रज्ञा सातव यांचा भव्य सत्कार केला. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, मिलींद यंबल, संचालक प्रशांत सोनी, माजी सभापती उत्तमराव जगताप, उमेश गुठ्ठे, सुनील भुक्तर, अॅड राजेश गोटे, विलास गोरे, पवन उपाध्ये आदींची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी सपत्नीक डॉ प्रज्ञा सातव यांचा सत्कार करीत भाजपला सातव यांच्या प्रवेशामुळे बळ मिळाले असून जिल्ह्यात भाजपची ताकद निश्चित वाढणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## जवळा बाजार शिवारात अवैध वाळू वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

औंढा नागनाथ ते परभणी मार्गावर जवळा बाजार शिवारात अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरसह ११ लाख रूपयांचा मुद्देमाल महसूल विभागाच्या पथकाने जप्त केला आहे. याप्रकरणी ट्रॅक्टरचालकासह मालकावर शुक्रवारी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

याबाबत अधिक माहीती अशी की, औंढा नागनाथ तालुक्यातील वाळू घाटावरून वाळूचा अवैध उपसा रोखण्यासाठी पोलिस विभाग आणि महसूल विभागाचे पथक कार्यरत आहे. या पथकाकडून वाळू घाटाकडे जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात असून वाळूची अवैध वाहतुक करणाऱ्या वाहनांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याकडून दररोज कारवाईचा आढावा घेतल्या जात आहे.

औंढा नागनाथ ते परभणी मार्गावर जवळाबाजार शिवारातून एका ट्रॅक्टरमध्ये अवैध वाळूची वाहतुक होत असल्याची माहीती महसूल विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीष गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी प्रभाकर काळे यांच्या पथकाने दि १९ डिसेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास जवळा बाजार शिवारात जाऊन पाहणी केली असता एका ट्रॅक्टरमध्ये वाळू आढळून आली. या पथकाने चालक गणेश सवंडकर याच्याकडे चौकशी केली असता त्याला समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. यावरून पोलिसांनी ट्रॅक्टर, त्यातील वाळू व इतर साहीत्य असा ११ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी मंडळ अधिकारी काळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ट्रॅक्टर चालक गणेश सवंडकर व मालकावर गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक के डी भगत, जमादार रविकांत हरकाळ पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, जिल्ह्यात अवैध वाळू माफीयांना पायबंद करण्यासाठी कडक कारवायांची अजूनही गरज असून मोठ्या माशांना पकडणे गरजेचे आहे.

## हिंगोलीत शांततेत व सुरळीत मतदान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

नगर पालिका निवडणुकीसाठी शनिवार दि २० डिसेंबर रोजी शहरातील प्रभाग क्र ५ ब व प्रभाग क्र ११ ब मध्ये सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला मतदारांनी रांगा लावल्या होत्या. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त लावला होता.

शनिवारी प्रभाग क्र ५ ब मधील केंद्र क्रमांक सहामधील मतदान यंत्रांचे बटन प्रेस होत नसल्यामुळे प्रारूप मतदानावेळी अडचणी निर्माण झाली. याची माहीती मिळताच उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी मतदान केंद्रावर जाऊन दुसरे मतदान यंत्र आणि मतपत्रिका युनीट तत्काळ बदलून मतदान प्रक्रिया उमेदवारांसमक्ष सुरू केली. इतर ठिकाणी सकाळपासून मतदान सुरळीत व शांततेत पार पडले आहे.

## व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी उद्योजक बनावे- शाम नैनवाणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**

येथील आदर्श महाविद्यालयाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमातील अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट व इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी निर्मल फूड प्रोडक्ट्स एन.टी.सी वसाहत, हिंगोली येथील फॅक्टरीला भेट दिली.



आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास आघाव च्या मार्गदर्शनाखाली मेजर पंढरीनाथ घुगे व प्रा.पंडित कुहाडे यांच्या समवेत विद्यार्थ्यांनी निर्मल फूड प्रॉडक्ट्स कार्यपद्धती प्रत्यक्ष समजून घेतली. या कारखान्यात तयार होणारे ब्रेड, तोस, खारी, पाव व त्याची विविध पॅकिंग व उत्पादनाची विविध राज्यात होणारी मागणी व पुरवठा याविषयी सविस्तर माहिती घेण्यात आली. या व्यवसायाचे मालक उद्योजक शाम नैनवाणी यांनी भेटीनंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी वयामध्ये पुस्तकी ज्ञान सोबत विविध उत्पादक व्यवसायांना भेटी ही सुवर्णसंधी असून विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने केले पाहिजेत. व्यवसायात कौशल्य वापरून समाजाला ज्या गोष्टी गरजेच्या आहेत त्या पुरविण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी आपण उद्योजक व्हावं. विद्यार्थी वयामध्ये अनेक क्षेत्रात असलेल्या सधींचा डोळसपणे आपण विचार केला पाहिजेत, त्यासाठी सामाजिक माध्यमांचा, पुस्तकी ज्ञान व भेटीचा उपयोग आपण आपल्या उन्नतीसाठी करू शकतो. या भेटीच्या अनुषंगाने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उभारून आपण स्वावलंबी बनावे अश्या भावना व्यक्त केल्या. कारखान्याला भेट देण्याची परवानगी दिल्याबद्दल कोमल लोंढे यांनी आभार व्यक्त केले. निर्मल फूड प्रॉडक्ट फॅक्टरी भेटीत वैष्णवी दवणे, अश्विनी लांडगे, अक्षरा शाहू ,तनया अग्रवाल, कोमल लोंढे,आरती शेळके, ऐश्वर्या गिरी, गोपाल सरडे, पवन घुगे ,भक्ती लुंगे, वैष्णवी सोनवणे, अश्विनी ठोके, शेख फैज, प्रदीप जाधव , धनंजय रणबावळे विद्यार्थी व विद्यार्थिनीने सहभाग घेतला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# खा. अशोक चव्हाण भाजपचे मनपा निवडणूक प्रमुख, तर पंकजाताई मुंडे प्रभारी





**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० डिसेंबर-**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांनी आगामी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी खा. अशोकराव चव्हाण तर प्रभारी पदाची जबाबदारी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यावर सोपवली आहे.

भाजपच्या प्रदेश कार्यालयाकडून या निर्णयाबाबतची पत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी मागील तीन महिन्यांपासून नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी जोरदार तयारीला प्रारंभ केला असून, संभाव्य उमेदवारांची सर्वेक्षणे, इच्छुकांच्या मुलाखती, समन्वय समितीचे गठन व इतर पूर्वतयारी पूर्ण झालेली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे निवडणूक प्रभारी तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना अवगत देखील केले आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्यासारख्या मातब्बर व मुरब्बी नेतृत्वाकडे नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीची सूत्रे सोपवण्यात आल्याने भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक वाढला आहे. त्यांनी यापूर्वी नांदेड महानगरपालिकेवर एकहाती वर्चस्व राखले असून, या निवडणुकीतही भारतीय जनता पक्षाचाच झेंडा फडकेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# माजी खा. वानखेडे, आ. कोहळीकर यांच्यावर मानहानीचा दावा करणार : खा. आष्टीकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २० डिसेंबर-**

कल्पना भागवतला केलेल्या मदतीबद्दल तसेच त्या महिलेची कनेक्शन पाकिस्तान व अफगाणिस्तानशी आलेल्यामुळे खा. नागेश पाटील आष्टीकर यांची चौकशीची मागणी करणारे माजी खा. वानखेडे व आ. कोहळीकर यांनी केलेल्या आरोपांवरती आज हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी पत्रकार परिषद घेत त्यांच्या आरोपाचे खंडन करत त्यांच्यावर घणघणाती आरोप केले. तुम्ही एका बापाचे असतील तर माझ्यावरती त्यांच्या मार्फत लावण्यात आलेले आरोप सिद्ध झाले तर मी लोकसभा सांसद पदाचा राजीनामा देईल .त्यांनी जाहिरीत्या माफी मागावी अन्यथा



त्यांच्यावर मानहानीचा दावा दाखल करणार असल्याचे प्रतिपादन खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी केले. यावेळेस शिवसेना (उबाठा) चे मराठवाडा संघटक कृष्णा पाटील आष्टीकर उपस्थित होते.

पुढे बोलताना खा.आष्टीकर म्हणाले की, माझ्यावर लागलेल्या आरोपांवरती मी यापूर्वीच दिल्लीत प्रसार माध्यमांना सविस्तर माहिती दिली असून यांना चौकशीची मागणी करणार असे सांगण्यापेक्षा त्याचे निवेदन द्यावे. निव्वळ राजकारणाचा भांडवल करण्यापलीकडे यांच्याकडे सध्या तरी कोणतेही उद्योग राहिले नाहीत. आलेल्या कोणत्याही व्यक्तीस मदत करण्याची ही आष्टीकर कुटुंबाची परंपरा असून ते यांच्यामुळे मी बंद करणार नाही. माजी खा. वानखेडे यांच्या मुलावर सुद्धा गुन्हा दाखल असून त्यात लवकरच निर्णय लागून शिक्षा होणार आहे. माझ्या पत्नीची तब्येत खराब असताना सुद्धा यांनी माझ्यावर एवढे खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करण्यापेक्षा विकासावर बोललेले बरे आहे ही चिखलफेक त्यांनी सुरू केली असून आता मी जशास तशी उत्तर देण्यास समर्थ आहे. मुस्लिम समाजास विनाकारण लक्ष करून त्यांना ज्या दृष्टिकोनातून पाहण्याचा लक्ष आहे ते आज उजागर झाले आहेत. सगळेच मुस्लिम बांधव हे आतंकवादी आहेत की काय ? आ. कोळीकरांना लक्ष करत सांगितले की, हा माणूस निवळ स्वतःच्या फायद्यासाठी सभागृहात प्रश्न उपस्थित करतो. यांच्या दोघांवरती निवडणुकीच्या खर्चाच्या माध्यमातून अनेकदा उपकार केलेले आहेत. कृष्णा पाटील आष्टीकर यांनी सुद्धा सांगितले की , एक किलो चांदीच्या वरी आम्ही सहकुटुंब लवकरच दत्त मंदिरास अर्पण करणार आहोत त्यांच्यावर सुद्धा देणगी लिहून न देण्याचा आरोप करण्यात आला होता. एकूणच खा. आष्टीकर व माजी खा. वानखेडे व आ. कोहळीकर यांच्यातील आरोप- प्रत्यारोपाचा सामना होणार असे या निमित्ताने दिसून येत आहे.

## मुदखेड येथील केंद्रीय विद्यालयात वार्षिकोत्सव उत्साहात साजरा

**मुदखेड** -पीएम केंद्रीय विद्यालय सीआरपीएफ मुदखेड येथे दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सीटीसी सीआरपीएफ कॅम्पस मधील ड्रिल शेड१ येथे वार्षिकोत्सव अत्यंत उत्साह आणि जल्लोषात साजरा करण्यात




आला. या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून पोलीस महानिरीक्षक ख्वाजा सजानुद्दीन यांनी उपस्थिती लावली. तसेच सीटीसी सीआरपीएफ मुदखेडचे कमांडंट व्ही. पी. त्रिपाठी हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलन व प्रमुख पाहुण्यांच्या औपचारिक स्वागतानंतर विद्यालयाचे प्राचार्य अजय एस. चौकीकर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विद्यालयाच्या उल्लेखनीय यशांची माहिती देणारा वार्षिक अहवाल सादर केला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य, संगीत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारस्याचे दर्शन घडविले. शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मुख्य अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि सर्जनशीलता पाहून उपस्थित प्रेक्षकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले. या प्रसंगी विद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वृत्तपत्रिकेचे औपचारिक उद्घाटन मुख्य अतिथींच्या हस्ते करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती आणि सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लिंकेश म्हस्के ( शिक्षक) यांच्यासह अझका काझी, अक्षया शिंदे, सेजल गोपीनवार आणि मिझबा फलक यांनी केले. तर मुख्याध्यापक पांडुरंग फाजगे यांनी आभार मानले. या समारंभाला यशस्वितेसाठी सीआरपीएफ येथील सर्व अधिकार्यांचे, केन्द्रीय विद्यालयातील समस्त कर्मचाऱ्यांचे तसेच विद्यार्थ्यांचे व सर्व पालकांचे सहकार्य लाभले. या वार्षिकोत्सवाने उपस्थित सर्वांवर सकारात्मक ठसा उमटवला आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयाची असलेली बांधिलकी अधोरेखित केली.

## शारदाबाई बेंबडे 'श्यामची आई' पुरस्काराने सन्मानित

**मुदखेड** -पुण्याच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या साने गुरुजी पुरस्कार प्रदान सोहळा वसमतनगर येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या दाभोळकर सभागृहात मोठ्या थाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजवादी नेते ॲड.




रामचंद्र बागल होते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम आणि प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. श्यामची आई हा पुरस्कार मुदखेड येथील मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे आणि त्यांची आई शारदाबाई बेंबडे यांना प्रदान करण्यात आला. शाल,पुष्पगुच्छ,सन्मान चिन्ह, सन्मानपत्र आणि ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.साने गुरुजी विचार साधना पुरस्कार गिरगाव येथील बहिर्जी विद्यालयाचे शिक्षक तथा रानकवी श्रीनिवास मस्के यांना सन्मानपूर्वक देण्यात आला.आंतरभारतीच्या उपाध्यक्षा तसेच महात्मा गांधी विद्यालयाच्या शिक्षिका संगीता देशमुख,आसेगाव येथील शिक्षक,कवी पांडुरंग बोराडे आणि उपक्रमशील शिक्षक मुंजाजी जोगदंड यांना साने गुरुजी शिक्षक प्रतिभा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला लेखिका, कवयित्री ललिता सबनीस,प्राचार्य डॉ.मा.मा.जाधव, साहित्यिक डॉ.कमलाकर चव्हाण, मुख्याध्यापक विकास मस्के, संजयकुमार माचेवार, शिवाजीराव सूर्यवंशी,नागनाथ आकनगीरे, बळवंत दुधंबे, राजकुमार कासले,सौ सुषमा विजयकुमार बेंबडे,सविता येनगे,बालाजी कासले,नरसिंग गुंडरे, सतिश भंडारे, मोहन गुरमे, यांच्यासह शहरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या नांदेड दक्षिण तालुका अध्यक्षपदी सोपान मोरे यांची निवड



**सोनखेड** - येथील तरुण उद्योजक सोपान देसाई मोरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाच्या नांदेड दक्षिणच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या दूरदर्शी नेतृत्वावर विश्वास ठेवून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहन हंबर्डे, यांच्या मार्गदर्शनाखाली सोपान मोरे यांच्यार ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सोपान मोरे यांच्या सातत्यपूर्ण जनसेवेचा, पक्षनिष्ठेचा आणि संघटनात्मक कार्याचा योग्य सन्मान या निमित्ताने झाला आहे.

# स्वच्छतेच्या कृतीतून राष्ट्रसंत गाडगे बाबांच्या विचारांना नायगांवकरांची मानवंदना

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २० डिसेंबर-**

स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा दीप प्रज्वलित करणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्य तिथीनिमित्त नायगांव शहरात त्यांच्या विचारांना कृतीची जोड देत भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

शहरातील राष्ट्रसंत गाडगेबाबा चौकात त्यांच्या प्रतिमेचे व नामफलकाचे पूजन करून उपस्थित मान्यवर व नागरिकांनी विनम्र आदरांजली अर्पण केली.यावेळी केवळ औपचारिक कार्यक्रम न करता, गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जपत स्वच्छता अभियान राबवण्यात आले. परिसराची



साफसफाई करून 'स्वच्छतेतूनच खरा विकास' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला गेला.

या उपक्रमात अंधश्रद्धा, अस्वच्छता व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी समाजाने एकत्र येणे किती आवश्यक आहे, यावर उपस्थितांनी आपले विचार व्यक्त केले. गाडगेबाबांचे कार्य आजच्या पिढी साठी प्रेरणादायी असून त्यांचे विचार अंगी कारण्या ची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली आहे. नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सूर्यकांत सोनखेडकर व डेबूजी फोर्सचे प्रदेशाध्यक्ष कैलास तेलंग टेंभुर्णीकर यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन श्रद्धेने अभिवादन करण्यात आले.

यावेळी विनायक चव्हाण, माधवराव शिकारे, बालाजी खडके, बालाजी तळणी कर, कांतू खडके, राजेश हुसेकर, विकी कौठेकर, संभाजी खडके, डेबूजी फोर्सचे तेलंग यांच्यासह शहरातील नागरिक व समाजबांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या विचारांचा जागर करत, समाज हितासाठी स्वच्छता व सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा संकल्प यानिमित्ताने नायगांव करांनी केला.

# माळेगाव यात्रेत भाविकांसाठी शुद्ध पाणीपुरवठा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० डिसेंबर-**

माळेगाव यात्रेत भाविकांसाठी शुध्द, पुरेसा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली तसेच पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ही पाणीपुरवठा व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

लिंबोटी जलाशयामध्ये बसविण्यात आलेल्या १२० एचपी क्षमतेच्या व्हर्टिकल टर्बाईन पंपाद्वारे तसेच लिंबोटी जलशुद्धीकरण केंद्रातील १०० एचपी क्षमतेच्या सेंट्रीफ्युगल पंपाद्वारे पाणी उचलण्यात येत आहे. या पाण्यावर तुरटी, ब्लीचिंग पावडर, फिल्टर मिडिया यांचा वापर करून शुद्धीकरण केले जात आहे. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ओटी टेस्ट घेऊन पाणी पिण्यास योग्य असल्याची खातरजमा केल्यानंतरच यात्रेसाठी पाणीपुरवठा केला जात आहे.

माळेगाव यात्रेसाठी जिल्हा परिषद लातूरकडून ३ टँकर, सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोलीकडून २ टँकर, गुरुद्वारा लंगर साहिबकडून २ टँकर तसेच नांदेड महानगरपालिकेकडून १ टँकर उपलब्ध करून देण्यात आला आहे. दररोज सकाळी ५ वाजल्यापासून ८ टँकरद्वारे सर्व हॉटेल्स व व्यापाऱ्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच घोडा लाईन, उंट लाईन, गाढव लाईन, तमाशा मंडळ, आकाश पाळणे, मंदिर गल्ली, पोलीस कॅम्प आदी ठिकाणी नियमितपणे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दोन बसस्थानकांवर प्रत्येकी एक टँकर तैनात ठेवण्यात आला असून, एक टँकर अतिरिक्त राखीव ठेवण्यात आला आहे. याशिवाय जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित विविध कार्यक्रमांच्या ठिकाणीही दिवसभर टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

## 'शब्दनाद' आणि 'प्रेमगंध' पुस्तकांचे विमोचन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० डिसेंबर-**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गीतकार व संगीतकार माधव जाधव लिखित छत्रपती संभाजीनगर येथील चिन्मय प्रकाशनाने सिद्ध केलेल्या 'शब्दनाद' या गीतसंग्रहाचे आणि युवाकवी धम्मोदय वाघमारे यांच्या छत्रपती संभाजीनगरच्या साहित्यसेवा प्रकाशनाने सिद्ध केलेल्या 'प्रेमगंध' या चारोळीसंग्रहाचे आज रविवारला दि.२१ रोजी शहरातील शिवाजीनगरस्थित हॉटेल विसावा पॅलेस येथे सकाळी ११ वाजता दोन्ही पुस्तकांचे विमोचन होणार आहे.

# माळेगाव यात्रेत तलाव परिसरात जीव रक्षकांची तैनात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० डिसेंबर-**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेदरम्यान तलाव परिसरात भाविकांच्या सुरक्षिततेसाठी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या वतीने पाच प्रशिक्षित जीव रक्षकांची नियुक्त करण्यात आले आहेत. या जीव रक्षकांमध्ये गजानन हिवरे, गणेश कोमटवार, अशोक नंदाने, वैभव हिरवे व सचिन हिरवे यांचा समावेश आहे.

माळेगावयात्रेतील तलावामध्ये मोठ्या प्रमाणात भाविक स्नान तसेच कपडे धुण्यासाठी येत असतात. संभाव्य अपघात टाळण्यासाठी व भाविकांचे प्राण सुरक्षित राहावेत यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या सूचनेनुसार नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने येथे पाच जीव रक्षकांची सेवा उपलब्ध करून दिली आहे. हे जीव रक्षक तलाव परिसरात सतत सतर्क राहून नागरिकांना पाण्यात उतरताना काळजी घेण्याचे मार्गदर्शन करत आहेत, तसेच धोकादायक ठिकाणी जाण्यास मनाई करत संरक्षणाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत आहेत. विशेष म्हणजे या जीव रक्षकांनी नांदेड शहरात गणपती व नवरात्रोत्सवाच्या काळातही उत्कृष्ट कार्य केलेले आहे. यंदा पहिल्यांदाच माळेगाव यात्रेत जीव रक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याने भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, यात्रेतील सुरक्षिततेला मोठे बळ मिळाले आहे.

# सेंद्रिय शेती काळाची गरज : प्रणिताताई देवरे चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० डिसेंबर-**

रासायनिक खतांचा अतिरेक टाळून सेंद्रिय शेतीकडे वळणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांनी केले. जिल्हा परिषद नांदेडच्या कृषी विभागाच्या वतीने माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित कै. डॉ. शंकरराव चव्हाण कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्रवार आऊलवार, माजी सभापती आनंदराव पाटील, रोहित पाटील, मोहीम अधिकारी सचिन कपाळे, गणेश साळवे, कृषी विज्ञान केंद्र पोखरणीचे डॉ. देविकांत देशमुख, डॉ. आर. एन. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रणिताताई पुढे म्हणाल्या, रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा पोत खालावतो, उत्पादन खर्च वाढतो आणि आरोग्यावरही दुष्परिणाम होत आहेत. सेंद्रिय शेतीतून मिळणारे उत्पादन आरोग्यदायी असून खर्चही कमी होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीची कास धरावी, असे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांना कृषी विभागाने अधिक प्रसिद्धी द्यावी, जेणेकरून इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळेल. या प्रसंगी सन २०२५२६ या वर्षासाठी निवड करण्यात आलेल्या जिल्ह्यातील १६ प्रगतशील शेतकऱ्यांचा स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पहार, जोड आहेर व प्रमाणपत्र देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला. शेतीत सातत्यपूर्ण उत्पादन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व प्रेरणादायी कार्यासाठी या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच समाज कल्याण विभागाच्या वतीने आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

**कृषिनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी**

दीपक माणिकराव पावडे पुणेगाव (नांदेड), सोमेश्वर हरी खानसोळे- वाडी नियमतुल्लापूर (मुदखेड), आनंदा शिवाजी अंभोरे- सावरगाव (अर्धापूर), बालाजी नागोराव कदम- चीदगिरी (भोकर), उत्तमराव बाबुराव काळे- मरडगा (हदगाव), बाबुराव भुजंगराव वानखेडे- पळसपूर (हिमायतनगर), परसराम गणपती फोले- लोखंडवाडी (किनवट), शेषराव प्रेमा राठोड- पापळवाडी (माहूर), राजू माधवराव ढगे- इज्जतगाव (उमरी), सूर्यकांत शेषराव उमरे- सालेगाव (धर्माबाद), पोचाबाई नागोराव तुडमे- सगरोळी (बिलोली), सुनील नामदेव चिमणपाडे- कुडली (देगलूर) रामदास माधवराव माळेगावे- गोजेगाव (मुखेड),बळीराम गंगाधर रुंझे- संगुचीवाडी (कंधार), विश्वनाथ पंडितराव जायभाये- नगारवाडी (लोहा), संदीप मोहनराव शिंदे- मांजरम (नायगाव) या पुरस्कार वितरण सोहळ्यामुळे माळेगाव यात्रेतील कृषी प्रदर्शनास विशेष आकर्षण लाभले असून, शेतकरी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# किनवट नगर परिषद प्रशासकीय इमारतीत ६ टेबलवर ५ फेऱ्यांत मतमोजणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २० डिसेंबर-**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक२०२५ ची मतमोजणी प्रक्रिया रविवारी (ता. २१ डिसेंबर २०२५) सकाळी १० वाजतापासून किनवट नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील उभारण्यात आलेल्या मतमोजणी कक्षात सुरू होणार आहे. यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी केली असून ६ टेबलवर ५ फेऱ्यांत मतमोजणी होणार असल्याची माहिती तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी दिली.

किनवट नगर परिषदेतून १० प्रभागांमधून एक अध्यक्ष व २१ नगरसेवक निवडून देण्यासाठी मंगळवारी (ता. २ डिसेंबर २०२५) मतदान प्रक्रिया पार पडली होती. या निवडणुकीत एकूण २९ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. यामध्ये पुरुष मतदार १२,३३४ पैकी ९,४३८, महिला मतदार १३,२५६ पैकी ९,५६८ तर इतर ३ पैकी २ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण २५,५९३ पैकी १९,००८ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ७४.२७ टक्के इतकी राहिली आहे.

अध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी ९० उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या सर्व उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले असून ही मतदान यंत्रे किनवट नगर परिषदेच्या पहिल्या मजल्यावरील स्ट्राँगरूममध्ये सशस्त्र पोलीस बंदोबस्तात तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कडक निगराणीत सुरक्षित ठेवण्यात आली होती.

प्रथम टप्प्यातील निवडणूक कार्यक्रमानुसार ३ डिसेंबर २०२५ रोजी




मतमोजणी होणार होती. मात्र, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार मतमोजणीची तारीख पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार रविवारी (ता. २१ डिसेंबर २०२५) सकाळी १० वाजता मतमोजणी घेण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार किनवट नगर परिषदेची मतमोजणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

मतमोजणीसाठी ६ टेबल ठेवण्यात आले असून ५ फेऱ्यांत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, एक मतमोजणी सहायक व एक शिपाई नियुक्त करण्यात आला आहे. एका फेरीत दोन प्रभागांची मतमोजणी केली जाणार आहे.

मतमोजणी परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून केवळ उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व टेबलनिहाय एका उमेदवाराच्या एका मतमोजणी प्रतिनिधीसच मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे. प्रवेशासाठी देण्यात आलेल्या ओळखपत्र (पास) अनिवार्य राहतील. मोबाईल फोन किंवा अन्य कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण सोबत आणण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

पहिली फेरी सकाळी १० वाजता सुरू होणार असून संबंधित प्रभागातील उमेदवार व प्रतिनिधींना सकाळी ९ वाजता मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश दिला जाणार आहे. संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया कायदा व सुव्यवस्था राखून शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी केले आहे.

या मतमोजणी प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी विवेक कांदे, नायब तहसीलदार तथा अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी चंद्रशेखर सहारे, नायब तहसीलदार म. रफिक म. बशीरोद्दीन, नायब तहसीलदार बालाजी फोले, निलेश राठोड, मीडिया नोडल अधिकारी तथा मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे व मल्लिकार्जुन स्वामी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सज्ज असून काटेकोरपणे कार्यरत आहेत.